सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १७ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ७५ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अखेर जनगणनेची प्रतीक्षा संपली!

## केंद्र सरकारकडून राजपत्र अधिसूचना जारी

नवी दिल्ली : केंद्र सरकारने आज देशात होणाऱ्या जनगणनेसाठी राजपत्र अधिसूचना जाहीर केली आहे. अखेर जनगणनेची दीर्घकाळापासूनची प्रतीक्षा संपली आहे. २०२७ मध्ये ही जनगणना होणार असून ती दोन टप्प्यात केली जाईल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही घोषणा करताना सांगितलं. यासाठी प्रत्येक स्तरावरील लोकांकडून



माहिती घेतली जाणार असून हे डिजिटल माध्यमातून म्हणजेच मोबाईल प्लिकेशन्समधून केलं जाणार आहे. दरम्यान २०२७ ला होणाऱ्या या जनगणनेच्या सर्वेक्षणाबद्दल या १० महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेणं अत्यंत आवश्यक आहे .

जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया १ मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होईल, जी सुमारे २१ महिन्यांत पूर्ण होईल. जनगणनेचा प्राथमिक डेटा मार्च २०२७ मध्ये प्रसिद्ध होऊ शकतो, तर सविस्तर डेटा प्रसिद्ध करण्यासाठी डिसेंबर २०२७ पर्यंत वेळ लागेल. त्यानंतर लोकसभा आणि विधानसभा जागांचे सीमांकन २०२८ पर्यंत सुरू होऊ शकते.

# महाराष्ट्रासह १६ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा

मुंबई : महाराष्ट्र, कर्नाटक, गोव्यासह मध्यप्रदेश, राजस्थान, बिहार आदी १६ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. रविवारी राजस्थानमध्ये सलग दुसऱ्या दिवशीही पूर्व-मान्सून सुरू राहिला आणि जयपूर, जोधपूरसह १४ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला. हवामान खात्याने आज राजस्थानमधील ११ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे, तर उर्वरित १४ जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडेल.

मंगळवारी (१७ जून) तामिळनाडू, पुडुचेरी, विदर्भ, पूर्व मध्य प्रदेश, गुजरात, सौराष्ट्र, बिहार, सिक्कीम येथे मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ओडिशा, उत्तराखंड, राजस्थान, छत्तीसगड, झारखंड, महाराष्ट्र, केरळ आणि कर्नाटक, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, बंगाल, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा येथे पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

बुधवारी (१८ जून) गुजरात, सौराष्ट्र, कच्छ, मध्य महाराष्ट्र, पूर्व मध्य प्रदेश, छत्तीसगड, केरळ, कर्नाटक, पूर्व उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बंगाल, सिक्कीम येथे मुसळधार



पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बिहार, झारखंड, ओडिशा, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा येथे पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मान्सून पुढील २४ ते ४८ तासांत मध्यप्रदेशात प्रवेश करू शकतो. त्यापूर्वी, पूर्व-मान्सून सक्रिय असल्याने, संपूर्ण राज्यात वादळ आणि पावसाचा कालावधी सुरू राहील. सोमवारी नरसिंहपूर आणि डिंडोरी येथे मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्याच वेळी, उर्वरित राज्यात पावसासह जोरदार वाऱ्यांचा इशारा हवामान खात्याने जारी केला आहे. उष्णतेच्या तीव्रतेत उत्तर प्रदेशात पावसाचा कालावधी सुरू झाला आहे. आज ६२ जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याचा अंदाज आहे की १८ जून रोजी गोरखपूर मार्गे मान्सून राज्यात प्रवेश करेल. रविवारी दिल्लीच्या अनेक भागात पाऊस पडला, ज्यामुळे गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत असलेल्या कडक उन्हापासून लोकांना दिलासा मिळाला. तथापि, दिवसाचे तापमान ४१.८ अंशांवर नोंदवले गेले. त्याच वेळी, केरळच्या अनेक भागात मुसळधार पाऊस सुरूच राहिला, ज्यामुळे झाडे उन्मळून पडली, नद्यांची पातळी वाढली आणि अनेक धरणांचे दरवाजे उघडावे लागले. दुसरीकडे, पावसाच्या रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर, सोमवारी मलप्पुरम, कन्नूर, कासरगोड, वायनाड आणि त्रिशूरमधील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सुट्टी जाहीर करण्यात आली होती. भारतीय हवामान खात्याने कर्नाटकात अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे, ज्यामुळे उडुपी आणि दक्षिण कन्नड जिल्हा प्रशासनाने सोमवारी सर्व शाळांमध्ये सुट्टी जाहीर केली.

# फटाका कारखाना स्फोटात ५ महिलांचा मृत्यू

अमरोहा : उत्तरप्रदेशच्या अमरोहा येथे एका फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट झाला. यामध्ये ५ महिलांचा मृत्यू झाला असून १२ जण गंभीर जखमी झाले आहे. जखमींपैकी अनेकांची प्रकृती अत्यवस्थ असल्याची माहिती पुढे आलीय.



अमरोहा येथील त्रासी गावापासून २ किलोमीटर अंतरावर जंगलात फटाक्यांचा कारखाना चालवला जात होता. कारखान्यात सुमारे २५ पुरुष आणि महिला काम करत होते. यादरम्यान, एका कामगाराच्या मुलाने फटाके पेटवले. त्यानंतर, जवळच ठेवलेले फटाके आणि गनपावडरला आग लागली. सुमारे १५ मिनिटे हे स्फोट सुरू राहिले. स्फोटानंतर कारखान्याचा ढिगारा ३०० मीटरपर्यंत पसरला. अनेक कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले. स्फोटाचा आवाज आणि धुराचे लोट ऐकून ग्रामस्थ घटनास्थळी पोहोचले. लोकांनी पोलिसांना माहिती दिली. जिल्हा प्रशासन, पोलिस आणि अग्निशमन दलाच्या पथके घटनास्थळी पोहोचली. ढिगाऱ्याखाली गाडलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी काम सुरू झाले. जिल्हाधिकारी निधी गुप्ता आणि एसपी अमित कुमार आनंद घटनास्थळी पोहचल्यात.

# बुलढाण्यात केसगळती, नखगळतीनंतर आता हातांना पडताहेत भेगा?

बुलढाणा : बुलढाणा हा जिल्हा काही दिवसांपूर्वी अजब आजारांमुळे चर्चेचा विषय बनला होता. काही दिवसांपूर्वी जिल्ह्यातील काही भागात लोकांच्या डोक्यावरील केस झपाट्याने गळत होते. त्यानंतर नख गळतीचा अजब प्रकार समोर आला होता. त्यानंतर आता येथील नागरिकांच्या हातांना भेगा पडण्याचा प्रकार समोर आला.

मेहकर तालुक्यातील शेलगाव देशमुख या गावातील नागरिकांच्या हातांना भेगा पडत असल्याचे समोर आले आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी आरोग्य विभागाला करण्यात आल्या आहेत. ही बाब समोर येताच आरोग्य पथक शेलगाव देशमुख या गावात दाखल झाले आहे. या पथकाकडून २० रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. अनेकांवर सध्या उपचार चालू आहेत. सतत वेगवेगळे आजाराचे गंभीर प्रकार उजेडात येत असल्याने येथील नागरिक त्रस्त झाले आहेत.

विशेष म्हणजे केंद्रीय आरोग्य, आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा मतदारसंघ असलेल्या गावात हा प्रकार घडला आहे. आरोग्य पथकाकडून रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी जवळपास सगळ्या रुग्णांना इसबगोल हा आजार असल्याचे दिसून आले. त्यांना हा आजार मागील १२ महिने ते ५ वर्षांपासून आहे. मागील १-२ वर्षांपासून बुलढाणा व अकोला येथील त्वचारोग तज्ज्ञांकडून रुग्णावर उपचार सुरु असल्याचे निष्पन्न झाले आहे. तर हा आजार संसर्गजन्य नसून या आजाराचा व पाण्याचा काहीही संबंध नाही. विविध प्रकारचे प्रतिजन, हानिकारक पदार्थ संपर्कात आल्यास स्वयंप्रतिकार (ऑटोइम्यून) पद्धतीचा हा आजार उद्भवू शकतो, असे डॉक्टर सांगतात. दरम्यान, सर्व रूग्णांनी काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# फ्लिपकार्टचा कंटेनर लुटणाऱ्या ८ दरोडेखोरांना अटक; २२ लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

हिंगोली, १६ जून -

वसमत तालुक्यातील भेंडेगाव शिवारात फ्लिपकार्ट चे पार्सल वाहतूक करणारा कंटेनर अडवून पार्सल लुटणाऱ्या ८ दरोडेखोरांना हिंगोली पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत अटक केली आहे. त्यांच्याकडून एक पिक अप, एक कार, दोन मोबाईल सह २२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अन्य दोघांचा शोध सूरु असल्याचे पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. कामगिरी बजावणाऱ्या पथकाचे कोकाटे यांनी कौतुक करीत त्यांना १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक



दिले आहे.

या पत्रकार परिषदेला पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधिक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विकास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माहिती देताना कोकाटे यांनी सांगितले की, कुरुंदा पोलीस ठाण्याअंतर्गत भेंडेगाव ११जून रोजी पहाटे ४ वाजता दरोडेखोरांनी कंटेनर अडवून चालक व वाहक यांना मारहाण केली. त्यानंतर कंटेनर मधील पाकिटे काढून एका कारमध्ये टाकून पळविण्यात आली. याप्रकरणी कुरुंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणात कुठलाही पुरावा नसल्यामुळे या घटनेचा शोध लावणे कठीण होते. परंतु पथकाने तांत्रिक तपास व गुन्हेगारांची माहिती मोठ्या शिताफीने घेतली. यावेळी कंपनीच्या वाहनाचे जुने चालक नागनाथ राऊत, मारोती भुताडे रा नांदेड यांना ताब्यात घेतले. त्यांनी रिसोड कार्यालयातील माजी व्यवस्थापक सर्वेश धूत याने टीप दिल्याचे सांगितले. त्यानंतर ८ जणांनी कंटेनर चा पाठलाग करून कंटेनर लुटले. या प्रकरणात पोलिसांनी ज्ञानेश्वर खानझोडे, परमेश्वर चोधरी, शंकर काळे, मंगेश काटे, मोहमद युसुफ, अभिषेक हलगे, सर्वेश धूत सर्व रा रिसोड यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून फ्लिपकार्ट चे १२४५ पार्सल, कार , पिक अप असा २२लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. उर्वरित दोन आरोपीचा शोध सूरु असून पथके रवाना करण्यात आली आहेत. सदरील कामगिरी पोलीस निरीक्षक विकास पाटील, सपोनी शीवसांब घेवारे, रामदास निर्दोडे, गजानन बोराटे, विक्रम विठूबोने, दिलीप मोरे, प्रवीण आगलावे, आझम प्यारेवाले, प्रेम चव्हाण, पांडुरंग राठोड, नितीन गोरे, गजानन पोकळे, लिंबाजी वाहिले, हरिभाऊ गुंजकर, किशोर सावंत यांनी बजावली.

# विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम अखिल भारतीय पुरोहित महासंघ व केशव माधव चतुर्वेद पाठशाळा तर्फे राज्यस्तरीय नि:शुल्क निवासी पुरोहित प्रशिक्षण शिबिर

छत्रपती संभाजीनगर - अर्चक म्हणजे मंदिरात पूजा करणारे आणि पुरोहित म्हणजे यजमानाकडे जाऊन पूजा सांगणारे असे विभाजन जरी असले तरी अनेक पुरोहित आणि अर्चक दोन्ही ठिकाणी पूजा करतात.

मंदिरे आणि देवांशी भाविकांचे नाते जोडणारे अर्चक पुरोहित यांचे हिंदू संस्कृतीमध्ये महत्त्वाचे स्थान आहे एका विशिष्ट उद्देशाने आमच्या ऋषीमुनींनी या दोन सामाजिक रचनांची निर्मिती केली आणि त्यांनी ती आत्तापर्यंत प्रभावीपणे बजावली त्यामुळे हिंदुत्वाचा प्रवाह सहज अखंड प्रभावीत राहिला आहे.

पुरोहित म्हणजे सर्वांचे हित पाहणारा असे म्हटले जाते. आज देशाच्या प्रत्येक भागात प्रत्येक जातीत पुरोहित आहेत पण लोकसंख्येच्या तुलनेत पुरोहिताची



संख्या खूप कमी आहे. हा भाग लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम, अखिल भारतीय पुरोहित महासंघ आणि केशव माधव चतुर्वेद पाठशाळा छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जून ते २७ जून २०२५ असे दहा दिवसाचे निशुल्क आणि निवासी पुरोहित प्रशिक्षण शिबिर संभाजीनगर जिल्ह्यातील निपाणी रोड आडगाव येथील केशव माधव चतुर्वेद पाठशाळेत आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरासाठी भुसावळ जळगाव धाराशिव किनवट धुळे संभाजीनगर तसेच सिंधुदुर्ग यवतमाळ नाशिक सोलापूर येथून आजपर्यतची ४० प्रशिक्षणार्थींची नोंद झाली आहे या नोंदीमध्ये प्रामुख्याने चांभार,मराठा, सोनार,कोकणी ,मारवाडी,गुरव,बारी,लेवा पाटील,धोबी,कासार,मातंग तसेच ब्राह्मण इत्यादी जातींचा समावेश आहे.

या शिबिरामध्ये नांदेड मधील वे.शा.सं. वेदमूर्ती श्री यज्ञेश्वर शास्त्री तसेच वे.शा.सं. वेदमूर्ती श्रीधरपंत भालेराव हे प्रशिक्षण देणार आहेत.

या शिबिरामध्ये गर्भाधारणा संस्कारापासून अंतेष्टीसंस्कारापर्यंत असलेले हिंदू संस्कृतीतील १६ संस्कार,सत्यनारायण पूजा,श्री गणपती पूजा वाहण पूजा भूमी पूजा असे छोटे-मोठे पूजा विधि जे नित्यनिमित्त करावे लागतात ते या वर्गात कृती सत्राच्या माध्यमातून शिकवले जाणार आहेत

पुरोहित प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन मंगळवार दिनांक १७ जून रोजी केशव माधव चतुर्वेद पाठशाळेत संपन्न होणार असून यासाठी विश्व हिंदू परिषद क्षेत्र मंत्री माननीय गोविंद शेंडे उपस्थित राहणार आहेत. तसेच पुढील दहा दिवसांमध्ये मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे अखिल भारतीय संपर्कप्रमुख अरुणजी नेटके क्षेत्र संपर्कप्रमुख अनिलजी सांबरे विश्व हिंदू परिषद प्रांत मंत्री योगेश्वर गर्गे प्रांताध्यक्ष संजय आप्पा बारगजे संघटन मंत्री श्री गणेश मोकाशी भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत.

पत्रकार परिषदेला विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांतअध्यक्ष माननीय संजय आप्पा बारगजे मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागिरदार अखिल भारतीय पुरोहित महासंघ महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष श्री मुकुंद खोचे केशव माधव चतुर्वेद पाठशाळा अध्यक्ष श्री लक्ष्मण माने आर्य श्री शिवाजी दहिवाल श्री ज्ञानेश्वर जाधव श्री सतीश मुळे श्री अभिषेक कादी उपस्थित होते.

# अंनिस कार्यकर्त्यांनी सजग राहण्याची गरज : डॉ. रश्मी बोरीकर

### नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

अंधश्रद्धेच्या विरोधात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी सजग राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अंनिसच्या राज्य उपाध्यक्षा डॉ. रश्मी बोरीकर यांनी सोमवारी, १६ जून रोजी केले. नवीन पदाधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंनिसची जिल्हा बैठक जिल्हाध्यक्ष श्रीराम जाधव यांचा अध्यक्षतेखाली रविवारी, १६ रोजी घेण्यात आली, यावळी त्या बोलत होत्या.

डॉ. पुढे म्हणाल्या की, सध्याची सामाजिक स्थिती परिवर्तनवाद्यांसाठी अत्यंत प्रतिकूल असली तरही विज्ञानवादी विचार सामान्यांपर्यंत पोचला पाहिजे. शहादा येथे ३०, ३१ मे आणि १ जून असे तीन दिवस विस्तारित राज्य कार्यकारिणीत झालली चर्चा आणि ठरावाची विस्तृत माहिती राज्य सरचिटणीस शहाजी भोसले यांनी दिली.

मृतांना श्रद्धांजली

यावेळी डॉ. बोरीकर आणि शहाजी भोसले यांची राज्य कार्यकारिणीत निवड झाल्याबद्दल त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. विविध शाखांच्या पदाधिकाऱ्यांनी आपले अहवाल सादर केले. दादासाहेब शिंदे, भास्कर बनसोडे यांनी प्रेरणा गीत गायिले. अंनिस कार्यकर्ते दिवंगत व्ही. सी. भुयागळे यांच्यासह शहिदांना व विमान दुर्घटनेत मृत पावलेल्या प्रवाशांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

प्रारंभी जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन जिल्हा कार्याध्यक्ष डी. एन. जाधव यांनी, तर आभार शहर शाखा कार्याध्यक्ष सीमा शिंदे यांनी मानले.

बैठकीस डॉ. अजित खोजरे, प्रशांत कांबळे, मोहन भोमे, डॉ. लुम्बिनी देबाजे, विजय मालुसरे, नितीन बारगळ, आनंद कसबेकर आदींसह सिल्लोड, लासूर स्टेशन, जळगाव घाट आदी शाखांतील कार्यकर्त्यांसह शहरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्री, मंत्री, जिल्हाधिकारी उच्चपदस्थांनी केले शाळेतल्या पहिल्या पावलाचे स्वागत

छत्रपती संभाजीनगर, दि.१६(जिमाका)- शाळेत पडणारे पहिले पाऊल हे ज्ञानाकडे पडते. ज्ञानाकडे पडलेल्या पहिल्या पावलाचे आज जिल्हाभरात मोठ्या उत्साहात स्वागत झाले. हे स्वागत करण्यासाठी हजर होते दस्तुरखुद्द पालकमंत्री, मंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,शिक्षणाधिकारी विविध उच्चपदस्थ अधिकारी, लोकप्रतिनिधी आदी.

जिल्हाभरात आज शाळाप्रवेशाचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. शाळेत येणाऱ्या नव्या विद्यार्थ्यांचे शाळेत आलेले पहिले पाऊल पुष्प, भेटवस्तू,मिठाई, सवाद्य मिरवणूक अशा उत्साहात साजरे झाले.

जि.प. केंद्र शाळा सातारा येथे पालकमंत्री शिरसाट यांनी केले चिमुकल्यांचे स्वागत

शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस. विद्यार्थ्यांचा शाळेतील प्रवेशाचा पहिला दिवस हा त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा देशपातळीवर नावलौकिक करणारा ठरावा. या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक पालक यांनी पुढाकार घ्यावा,असे आवाहन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी केले. सातारा जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळेत शाळा प्रवेश उत्सवावेळी पालकमंत्री शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, शिक्षण अधिकारी प्राथमिक जयश्री चव्हाण मुख्याध्यापक भावले, शाळेत प्रवेशित विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षक वृंद या कार्यक्रमास उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, जिल्हा परिषदच्या प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी हा सर्व गुण संपन्न व प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणारा उत्कृष्ट नागरिक बनावा यासाठी





जिल्हा परिषद शाळा आणि शिक्षण विभागाने प्रयत्न करावेत, शाळेच्या गुणवत्ता व सेवा सुविधासाठी शासनाचा निधी कमी पडू देणार नाही. राज्यात आज सर्वत्र शिक्षण क्षेत्रामध्ये महत्त्वाचा दिवस असून प्रथम प्रवेश घेणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रवेश उत्सव संस्मरणीय आणि उत्साहपूर्ण व्हावा यासाठी शासन स्तरावर प्रत्येक अधिकारी, मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत शाळेमध्ये प्रवेश उत्सव साजरा होत आहे. शासनाच्या जिल्हा परिषद अंतर्गत असणाऱ्या शाळा मधील शिक्षणाचा दर्जा गुणवत्ता पूर्ण करण्यासाठी शासन नेहमीच पुढाकार घेत आहे. या शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण ,विज्ञान. तंत्रज्ञान ,आरोग्य तपासणी, क्रीडा विकास, मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, आहार याबरोबरच सर्वांगीण शिक्षण होण्यासाठी पोषक वातावरण शिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाने उपलब्ध करुन दिल्या बद्दल पालकमंत्री शिरसाट यांनी कौतूक केले.

कार्यक्रमात पाठ्यपुस्तक व गणवेशाचे वितरण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

अशोकनगर, ब्रिजवाडीत इमावकल्याण मंत्री सावे यांच्या उपस्थितीत प्रवेशोत्सव

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या अशोक नगर आणि ब्रिजवाडी येथील शाळेत राज्याचे इतर मागास वर्ग बहुजन कल्याण, दुग्धविकास तसेच दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत श्री.सावे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश वितरित करण्यात आले. श्री.सावे म्हणाले की, महानगरपालिकेच्या सर्व शाळा स्मार्ट झाल्या असून या शाळेत सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. कॉम्प्युटर लॅब, ग्रंथालय तसेच खेळाचे मैदान हे सुद्धा उपलब्ध असल्यामुळे मनपा शाळांची पटसंख्या वाढलेली दिसून येते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. या प्रसंगी राजू शिंदे, उपायुक्त अंकुश पांढरे, शिक्षण अधिकारी भारत तीनगोटे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, मुख्याध्यापक संजय मडके व तिलोत्तमा मापारी तसेच शिक्षक विद्यार्थी आणि पालक बहु संख्येने उपस्थित होते.

सुदामवाडी येथे जिल्हाधिकारी बनले सारथी

जि.प. उच प्राथमिक शाळा सुदामवाडी केंद्र बोरसर येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या विद्यार्थ्यांना सजवलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये बसवून त्यांना शाळेत आणण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे स्वतः या ट्रॅक्टरचे सारथी बनले. सरपंच शोभाताई जगधने, उपसरपंच अर्चनाताई शेवाळे, नायब तहसिलदार महाजन, मंडळ अधिकारी फालक, जितेंद्र चापानेरकर, प्राचार्य वैद्य, प्रा. बाबासाहेब सोनवणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप पवार, पद्माकर शेवाळे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिल पुदाट, केंद्रप्रमुख दिलीप ढमाले, संजय शिंदे तसेच सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गणवेश, पुस्तके आदी वाटप करण्यात आले. त्यांचे भेटवस्तू आदी देऊन स्वागत करण्यात आले. जिल्ह्याभरात आज सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सर्व अधिकारी उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्मशानभूमीत अतिक्रमण; ग्रामपंचायतीसमोर रचले सरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** उदगीर तालुक्यातील आवलकोंडा येथे सार्वजनिक स्मशानभूमीसाठी सर्व्हे नंबर ४ मध्ये ९ गुंठे जमीन आहे. परंतु, या स्मशानभूमीच्या जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्यामुळे गावात मयत झालेल्या मृतदेहावर अंत्यविधी करण्यासाठी स्मशानभूमी असूनही अडचण निर्माण झाली आहे. सदरचे अतिक्रमण हटविण्यात प्रशासन हतबल झाले आहे. शनिवारी गावातील एका व्यक्तीचे निधन झाले होते. अंत्यविधीसाठी चक्क ग्रामपंचायत कार्यालयासमोर लाकडे टाकून सरण रचण्यात आले होते. दरम्यान, प्रशासनाच्या आश्वासनानंतर ग्रामपंचायतीसमोरील लाकडे हटवून सदर व्यक्तीचा अंत्यविधी शेतात करण्यात आला.

उदगीर तालुक्यातील आवलकोंडा येथील सर्व्हे नंबर ४ मध्ये ९ गुंठे जमीन ही सार्वजनिक स्मशानभूमीची असून सातबारावर सरकारी मसनवाटा म्हणून नोंद आहे. या स्मशानभूमीच्या जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. जानेवारी २०२५ मध्ये आवलकोंडा येथील ग्रामस्थांनी उदगीर तहसीलदारांकडे निवेदन देऊन समशानभूमीवरील अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी केली होती. चार हजार लोकसंख्येच्या गावात एकमेव सार्वजनिक स्मशानभूमी असून त्यावर अतिक्रमण झाल्याने गावात मयत झालेल्या मृतदेहाच्या अंत्यविधीसाठी अडचण निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले होते. स्मशानभूमीवरील अतिक्रमण हटवून जमीन मोजून अंत्यविधीसाठी खुली करून देण्यात यावी, अशी मागणी सहा महिन्यांपूर्वीच प्रशासनाकडे करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाकडून सदर स्मशानभूमीवरील अतिक्रमण हटविण्यात आले नाही. शनिवारी गावातील एका व्यक्तीचे निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीसाठी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लाकडे टाकून सरण रचण्यात आले. याची माहिती प्रशासनाला समजल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले.



### संक्षिप्त वृत्त...

## कॉक्सिट महाविद्यालयात २६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** कॉक्सिट महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत द असोसिएशन ऑफ सर्जन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी रक्तदान



शिबिर पार पडले. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी अशा २६ जणांनी रक्तदान केले.

यावेळी संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. विनायक जाधव, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, डॉ. डी. आर. सोमवंशी, डॉ. योगदानंद दडगे, डॉ. निखिल काळे, डॉ. अभिजीत रायते, डॉ. गणेश स्वामी, डॉ. अविनाश बदने, डॉ. दीपक गुगळे, प्रा. व्ही. डी. पाटील, प्रा. एस. आर. माने, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, प्रा. चव्हाण, 'रासेयो' कार्यक्रमाधिकारी प्रा. बी. बी. देवडे, अधीक्षक पी. आर. कावळे, संतोष कांबळे व कर्मचारी उपस्थित होते.

## बेशिस्त वाहतूक; चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दयानंद कॉलेज जाणाऱ्या रोडवर वर्दळीच्या ठिकाणी वाहतुकीला अडथळा होईल, अशा स्थितीत रस्त्याच्या मधोमध वाहन उभे करून बेशिस्त स्थितीत प्रवासी घेण्याकरिता ऑटो चालक मिळून आल्याची घटना १४ जून रोजी घडली.

याबाबत पोलिस कर्मचारी श्याम कच्छवे यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित ऑटो चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्वतःच्या व इतरांच्या जीविताला धोका निर्माण होईल, अशा पद्धतीने ऑटो उभा केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

## दुचाकीची चोरी; अज्ञातावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** शहरातील काशिलिंगेश्वर नगर ते रेणापूर नाका माउली किराणा स्टोअरच्या समोर पार्किंग केलेल्या एमएच २४ बीजे १४४७ या क्रमांकाच्या दुचाकीची चोरी झाल्याची घटना घडली.

याबाबत बालाजी विश्वंभर माने (रा. हारवाडी ता. रेणापूर, जि. लातूर) यांनी विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जुन्या वापरातील ३० हजार रुपये किमतीची दुचाकी असल्याचे तक्रारीत नमूद आहे. तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल हराळे करीत आहेत.

## लातूर शहरात शॉर्टसर्किटमुळे घराला आग; लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** शहरातील लाहोटी कम्पाउंड परिसरातील गजबजलेल्या परिसरात एका घराला शॉर्टसर्किटमुळे रविवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास आग लागली. या आगीत घरातील साहित्य जळून खाक झाले असून, अंदाजे १२ ते १५ लाखांचे नुकसान झाले असल्याचे महापालिकेच्या अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले.

लाहोटी कम्पाउंड, कस्तुरीनगर दयाराम रोड येथे रंजिता संजय पंपटवार यांचे घर आहे. या घराला शॉर्टसर्किटमुळे दुपारी अडीच वाजेच्या सुमारास अचानक आग लागली. मनपाच्या अग्निशमन दलाचे तीन बंब तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या पथकाने अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली असली तरी फर्निचर तसेच अन्य साहित्य जळून खाक झाले. अग्निशमन दलाचे पवन शिंदे, ज्ञानेश्वर मगर, जे.बी. शेख, महेबुब शेख, प्रवीण खडसे, नीलेश दुरपल्ले, सागर पवार, मनीषा गवळी, सचिन राठोड यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

# विषाणूजन्य आजारांचे रुग्ण वाढले

### प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** शहरासह जिल्हाभरात मागील पंधरा दिवस सातत्याने जोरदार मान्सूनपूर्व पाऊस बरसला. यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आणि साचलेल्या पाण्याच्या डबक्यांमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. जिल्हाभरात विषाणूजन्य आजार बळावले आहेत. नागरिकांसह बालके आजारी पडत असून सर्दी, ताप, खोकल्यासह घसादुखी, डोकेदुखी आजार होत असल्याने रुग्णालये हाऊसफुल्ल दिसत आहेत.

लातूर शहरासह जिल्हाभरात मागील पंधरा दिवसांत सातत्याने जोरदार अवकाळी पाऊस झाल्याने वातावरणात बऱ्यापैकी बदल झाला आहे. अधून मधून काही काळ मुसळधार पाऊस कोसळला.



नदी, नाले दुथडी भरून वाहिली. प्रकल्पातील पाणीसाठ्यांमध्येही वाढ झाली आहे. वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून उष्णतेमुळे हैराण झालेल्या नागरिकांना यामुळे दिलासा मिळाला असला तरी वातावरणात बदल झाल्याने आजार मात्र बळावले आहेत. बालके, महिला, युवती, वृध्द नागरिक मोठ्या संख्येने आजारी पडत आहेत. विषाणूजन्य आजाराने अनेकजण ग्रासले आहेत. शहरासह ग्रामीण भागात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यातून डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजारांची लक्षणे दिसून येत आहेत. चिकनगुनियासारखे घातक आजार बळवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे डास निर्मूलनासाठी धूर फवारणी करण्यात यावी. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपजिल्हा रुग्णालयांसह खासगी रुग्णालयात रुग्णांची गर्दी वाढली आहे. सर्व रुग्णालयांत तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नियमित हजर राहावे, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून करण्यात येत आहे.

### आरोग्याची काळजी घ्यावी : डॉ. बालाजी शिंदे

वातावरणातील बदलामुळे विषाणूजन्य आजार बळावतात. नागरिकांनी हाथ, पाय स्वच्छ धुऊन जेवण करावे. ताजे गरम अन्न ग्रहण करावे, पाण्याचे भांडे रोज स्वच्छ ठेवावे. घराचे अंगण स्वच्छ ठेवावे. उघड्यावरील अन्नपदार्थ खावू नयेत. पाणी गाळून – उकळून प्यावे. भाजीपाला धुवून वापरावा. शिंकताना व खोकताना रुमाल धरावा, यामुळे आजार पसरणार नाहीत. अस्वस्थ वाटत असल्यास डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे यांनी केले आहे.

## वृध्दाला लुटणारे चोरटे ४ तासांत गजाआड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** औसा तालुक्यातील लामजना परिसरात रोडवर एका ८० वर्षीय वयोवृध्दाला मारहाण करून लुटणाऱ्या तीन आरोपींना किल्लारी पोलिसांनी अवघ्या चार तासांत ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करून अटक केली आहे.

किल्लारी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लामजना परिसरातील रोडवर शनिवारी दुपारी साडेबारा वाजता रोडवरून जाणाऱ्या एका ८४ वर्षीय वृध्दाला तू आमच्या अंगावर का थुंकलास, असे म्हणून मारहाण करून त्यांच्याजवळील १५ हजार रुपये रोख व हातातील सोन्याच्या अंगठ्या अज्ञातांनी हिसकावून नेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी किल्लारी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात किल्लारी ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल शहाणे यांनी तत्काळ अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून तपासाची चक्रे फिरवली. दरम्यान, सदर गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न झाले. वसीम रजाक शेख, इम्रान महताब शेख आणि कौरव जनक लहाडे यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांत्याकडून सोन्याची अंगठी व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात किल्लारीचे सहायक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल शहाणे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शिंदे, ढोणे, पोलीस अंमलदार गणेश यादव, दत्ता जाधव यांनी ही सेवा बजावली.

## 'राजमाता जिजामाता'चे 'नीट' परीक्षेत घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** महाराष्ट्र टेस्टिंग एजन्सीच्यावतीने वैद्यकीय प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणाऱ्या 'नीट' परीक्षेत येथील राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

ईशिता अरविंद खोत ही ४८९ गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम, सिध्दी संजय अंबुसकर ही ४५० गुण घेऊन द्वितीय, तर गीता गोरोबा गोरे ही ४२० गुण घेऊन तृतीय आली आहे. तसेच यश गोपाळ जाधव याने ३९७, दिशा तानाजी चोरघे ३८०, रुद्राक्ष तुळशीदास बंडगर ३१५, अमर शरद जाधव ३१०, तर मृणाल विवेक आवळे आणि वेदिका गोपालदास तिवारी यांनी प्रत्येकी ३०० गुण मिळविले.

या यशाबद्दल संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, पुणे शिक्षण संचालक कार्यालयातील शिक्षण उपसंचालक डॉ. वंदना वाहुळ, शिक्षणाधिकारी दत्तात्रय मठपती, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे, राणी केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. फंड, प्रा. वैशाली पाटील, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते यांनी कौतुक केले.

## 'तुळजाभवानी'चे सीईटी परीक्षेत उत्तुंग यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** सीईटी सेलमार्फत घेण्यात आलेल्या एमएचटी-सीईटी परीक्षेचा निकाल घोषीत करण्यात आला असून, या परीक्षेत येथील संत ज्ञानेश्वर नगरातील तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.

माहेश्वरी कमलाकर अंधारे ही विद्यार्थिनी ९४ पर्सेंटाईल मिळवत महाविद्यालयात प्रथम, संकेत अविनाश नरवडे ८९ पर्सेंटाईल द्वितीय, तर मुस्कान संजयकुमार सचदेव ही ८८ पर्सेंटाईल मिळवत तृतीय आली आहे. तसेच संपदा बालाजी कटकमवार हिने ८५ पर्सेंटाईल, रोहन रमेश पांचाळ ८५, सार्थक सतीश शेळके ८२.०५, सृष्टी दिनकर मुळे ८०, गोविंद ज्योतीराम



भोसले ७६.६०, प्रणव जीवनराव गरड ७४.५४ तर हर्षवर्धन विनोद बद्दे याने ५० पर्सेंटाईल मिळविले आहेत.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे आदींनी कौतुक केले.

## कराडांच्या वाढदिनी साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांच्या जन्मदिनानिमित्त मुरुड ग्रामपंचायतीच्यावतीने अडीच हजार नागरिकांना कचराकुंडी, २३ अंगणवाडींना कपाटाचे वाटप भाजपचे युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यानिमित्त शहरात विविध सार्वजनिक ठिकाणी नागरिकांसाठी १०१ सिमेंटचे बेंचही बसविण्यात आले.

यावेळी मुरुडच्या सरपंच अमृता नाडे, उपसरपंच हनुमंत नागटिळक, ग्रामपंचायत सदस्य महेश कणसे, आनंद कणसे, सूरज सूर्यवंशी, तात्या ईटकर, लता भोसले, वैजनाथ हराळे, विशाल कणसे,



शायना शेख, संजय शिंदे, रामदास चव्हाण, रमजान सय्यद, नागनाथ बचाटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या निमित्त आयोजित कार्यक्रमात युवा नेते ऋषिकेश कराड यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत मुरुडची ग्रामपंचायत तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात मूलभूत सुविधा पुरविण्याबरोबरच सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. आमदार रमेश कराड यांच्या माध्यमातून मतदारसंघातील गावागावात, वाडी-वस्तीत रखडलेल्या विकासाला गती मिळाल्याचेही ते म्हणाले.

## जिल्ह्यात छापेमारी; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** पोलिसांनी मासरेडचे आयोजन करून जिल्ह्यातील हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर, देशी-विदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्यांवर छापेमारी करून ४३ जणांवर गुन्हे दाखल करत ६ लाख ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवून कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात शनिवारी पहाटे मासरेडचे आयोजन करून लातूर जिल्ह्यातील लपून-छपून हातभट्टी



दारू तयार करणाऱ्या ठिकाणांवर कारवाई करत हातभट्टी दारू तयार करणारे, देशी-विदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्या ४३ जणांवर गुन्हे दाखल करून ६ लाख ४४ हजार ८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून हातभट्टीचे रसायन नष्ट करण्यात आले. या विशेष मोहिमेत २८ पोलीस अधिकारी आणि १२३ पोलीस अंमलदारांचा समावेश होता.

अवैध धंद्यांविरुध्द जोरदार कारवाई करण्यात येत असून सदरची कारवाई यापुढेही सुरूच राहणार असल्याचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी म्हटले आहे.

## खासदार डॉ .शिवाजी काळगे यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** राष्ट्रीय सर्जिकल चिकित्सक दिनानिमित्त लातूर सर्जिकल सोसायटी व इंडियन मेडिकल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला. उत्स्फूर्तपणे शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन लातूरचे विद्यमान खासदार डॉ.शिवाजी काळगे यांनी रक्तदान करून केले. या महा रक्तदान शिबिराने जनजागृती सप्ताहाची सांगतात झाली.

राष्ट्रीय शल्य चिकित्सक दिनानिमित्त लातूर सर्जिकल सोसायटी व इंडियन मेडिकल असोसिएशन आणि वुमन विंग यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरमध्ये जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताह मध्ये जनजागृती रॅली, अवयव



दान, देहदान याचे महत्त्व लक्षात जनजागृती करण्यात आली. वेगवेगळ्या ठिकाणी रक्तदान शिबिर आदी उपक्रम घेण्यात आले.

रविवारी डॉ. भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहामध्ये आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन लातूरचे विद्यमान खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी सर्जिकल सोसायटी व इंडियन मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच सह्याद्री हॉस्पिटल, पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभळगाव, टोयोटा शोरूम, बीएसएफ ट्रेनिंग सेंटर चाकूर ,विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालय आदी ठिकाणी महा रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या शिबिरामध्ये शेकडो स्त्री -पुरुष रक्तदात्यांनी रक्तदान करून या महायज्ञात आपले योगदान दिले.

डॉ.भालचंद्र रक्तपेढीच्या आवारामध्ये आयोजित रक्तदान शिबिर उद्घाटन प्रसंगी इंडियन मेडिकल असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष डॉ. अभय कदम , वुमेन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. ज्योती सूळ ,लातूर सर्जिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. योगानंद दडगे, सचिव डॉ. निखिल काळे ,उपाध्यक्ष डॉ.अभिजीत रायते, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सर्जेन्स ऑफ इंडियाचे एक्सिकटीव्ह कौन्सिल मेंबर डॉ दिपक गुगळे, तसेच डॉ.हंसराज बाहेती , डॉ. अजय पुनपाळे, डॉ. रवी इरपतगिरे, डॉ . ज्ञानेश्वर पांचाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. या रक्तदान शिबिरामध्ये विद्यमान खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, डॉ. ज्योती सूळ,डॉ. संजय वारद , डॉ. अभय कदम, डॉ . प्रियंका डावळे-जाधव, डॉ . प्रियंका राठोड, डॉ. संगीता कदम आदी डॉक्टरांनी रक्तदान केले.

कॉकसिट कॉलेज येथील रक्तदान शिबिरामध्ये डॉ. हळदीकर, डॉ. अतुल लातूरकर ,डॉ. अजय इरपतगिरे ,डॉ. नितीन सर्जे आदींच्या अधिपत्याखाली रक्तदान शिबिर यशस्वी झाले. टोयाटो शोरूम येथे डॉ. रवी इरपतगिरे ,डॉ.भास्कर केंद्रे ,डॉ.अभिजीत वानखेडे यांच्या अधिपत्याखाली रक्तदान शिबिर घेण्यात आले.

## चित्त थरारक प्रात्यक्षिकांनी मनपाचे दहा दिवसीय तायक्वांदो स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ जून -** लातूर महानगरपालिका व तायक्वांदो असोसिएशन ऑफ लातूर यांच्या वतीने मनपा शाळा क्रमांक ११ येथे मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसुळे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या तायक्वांदो स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचा रविवारी मुख्याध्यापक वैभव बोंदर यांच्या उपस्थितीत चित्त थरारक प्रात्यक्षिकांनी समारोप करण्यात आला.

महानगरपालिकेतील शाळेत विविध क्रियाशील उपक्रमाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसुळे व मनपा शिक्षण विभाग प्रमुख श्वेता नागणे यांच्या संकल्पनेतून मनपा विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीशी लढता यावे व विद्यार्थी स्वयंसिद्ध व्हावे



या हेतूने दहा दिवसीय तायक्वांदो प्रशिक्षण शिबिराचे लातूर मनपा व तायक्वांदो असोसिएशन यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.

दहा दिवस चाललेल्या या तायक्वांदो स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना आशियाई तायक्वांदो प्रशिक्षक तथा राष्ट्रीय पंच मास्टर नेताजी जाधव, मास्टर धनश्री मदने व मास्टर जान्हवी मदने यांनी तायक्वांदो मार्शल आर्ट प्रशिक्षण दिले तर मनपा शाळेच्या वतीने दहा दिवस नियमित पोषक आहार, फळे व शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या शिबिरात प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी हाताने, पायाने व डोक्याने फरशा फोडून प्रशिक्षणात देण्यात आलेले धाडस, साहस, आत्मविश्वास, निर्भयता व असाधारण ताकदीचा प्रत्यय उपस्थितांना आणून दिला.

या प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनात मनपा शाळा क्रमांक ११ चे शिक्षक देवराज लंगोटे, ईश्वरप्रसाद मांडे, सौ अनिता गुजे व भुतकर ताई यांनी हिरीरीने भाग घेतला होता.

## अवैधपणे जनावरांची कत्तल करून गोमांस काळीपिवळीतून वाहतूक करताना पकडले

गंगापूर दि.१६ : गंगापूर शहरातून बेकायदेशीर रित्या काळी पिवळ्या जीप मधून जनावरांची कत्तल केलेले मास विक्री साठी घेऊन जाणारे काळी पिवळी व त्यातील मास गंगापूर पोलिसांनी पकडले आहे.

गंगापूर पोलिसांना माहिती मिळाली की विनापरवाना जनावराचे कत्तल केलेले मास विक्रीसाठी घेऊन जाण्याच्या तयारीत आहे. यावरून गंगापूर पोलिसांनी रविवार (ता.१५) रोजी दुपारी साडेअकरा ते बारा वाजेच्या दरम्यान पोस्ट ऑफिस जवळील कुरेशी मोहल्ला जुन्या गेस्ट हाऊसच्या जागेवर काळी पिवळी महेंद्रा कंपनीची गाडी क्र. एम एच २० बी टी ६००६ ही गाडी तेथे आढळून आली. या गाडीची तपासणी केली असता सात पांढऱ्या रंगाच्या गोण्यामधील २१० किलो वजनाचे ४२ हजार रुपये किमतीचे व तीन पिवळ्या रंगाच्या गोण्यामधील ९ हजार रुपये किमतीचे ४५ किलो वजनाचे जनावरांचे मास कुठलेही परवाना नसलेले विक्रीसाठी घेऊन जाण्याच्या तयारीत असल्याचे आढळून आले. असे एकूण ५१ हजार रुपयांचे किमतीचे २५५ किलो जनावराचे मास विनापरवाना घेऊन जात आढळून आले. यावरून पोलिसांनी ३ लाख रुपये किमतीची काळी पिवळी गाडी व ५१हजार रुपयांचे किमतीचे मास जप्त केले असून एकूण ३ लाख ५१ हजार रुपयाच्या ऐवज जप्त केले आहे. याविषयी ची तक्रार पोलीस उपनिरीक्षक औदुंबर मस्के यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ प्रमाणे गुन्हा अमलदार सरोदे यांनी नोंदवून पोलीस निरीक्षक कुमार सिंग राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली अमलदार दिनकर थोरे हे पुढील तपास करीत आहे.

## एमजीएममध्ये मोफत मास्टर क्लासचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या वतीने व्हिडिओ प्रॉडक्शनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत मास्टर क्लासचे शुक्रवार, दिनांक २० जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर सत्यजीत शोभा श्रीराम हे मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राद्वारे विद्यार्थ्यांना व्हिडिओ प्रॉडक्शन क्षेत्रातील करिअरच्या संधी, आवश्यक कौशल्ये, इंडस्ट्रीतील प्रत्यक्ष अनुभव आणि नवोदितांसाठी असणाऱ्या व्यावसायिक संधींची माहिती मिळणार आहे. विशेष म्हणजे, या सत्रामध्ये व्हिडिओ प्रॉडक्शन सर्टिफिकेट कोर्स संदर्भात सविस्तर माहिती दिली जाणार असून माध्यम क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या मास्टर क्लाससाठी सर्वांना मोफत प्रवेश असून इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी एमजीएम विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर ु.ासीं. रल.ळप भेट द्यावी अथवा कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर ॲण्ड मीडिया येथे संपर्क साधवा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## स्कोडा ऑटो भारताच्या विकासासाठी सज्ज

छत्रपती संभाजीनगर, १२ जून २०२५ : वर्ष २०२५ जगभरातील स्कोडा ऑटोसाठी महत्त्वपूर्ण आहे, जेथे यंदा संपन्न वारसाची १३० वर्षे आणि भारतात २५ उत्साहवर्धक वर्षे साजरी केली जात आहे. ग्राहकांच्या जवळ पोहोचण्याच्या धोरणाला अधिक दृढ करत स्कोडा ऑटो इंडियाने भारतातील बाजारपेठेमधील गतीला चालना देण्यासाठी प्रमुख ब्रँड, उत्पादन, नेटवर्क आणि ग्राहक-केंद्रित उपक्रमांची रूपरेषा आखली आहे. याप्रसंगी मत व्यक्त करत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, ''भारत युरोपबाहेर स्कोडा ऑटोसाठी सर्वात महत्त्वाची विकास बाजारपेठ आहे. आम्ही उद्देशपूर्ण क्षमता, सुस्पष्ट दृष्टिकोन आणि गतीशील अंमलबजावणीसह मजबूत, भविष्यासाठी सुसज्ज ब्रँड निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आमचे प्रॉडक्ट ऑफेन्सिव्ह धोरण ग्राहकांच्या सर्वसमावेशक गरजा आणि महत्त्वाकांक्षांशी सुसंगत आहे, जे आमच्या प्रगतीप्रती प्रवासाला गती देत आहे. आम्ही ग्राहकांच्या जवळ पोहोचत आहोत, धोरणात्मकरित्या आमचे नेटवर्क विस्तारित करत आहोत आणि दर्जा, सुरक्षितता व मूल्याप्रती आमचा वारसा अधिक दृढ करत आहोत. आमच्या सर्व व्यवसाय कार्यांमध्ये विकासाला गती देण्यासह २०२५ उत्तम वर्ष ठरेल, जेथे आम्ही मोठ्या प्रमाणात ब्रँडला प्रबळ करू आणि भारतात प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहू.''

## भगवती विद्यालय बिडकीन येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५ प्रवेश उत्सव साजरा



बिडकीन दि १६ में : पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन येथे दि १६ में रोजी प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थी मान्यवरांच्या हस्ते नवागतांना नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वही पेन शैक्षणिक साहित्याचे याप्रसंगी वाटप करण्यात आले. व पुष्पगुछ देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रसंगी सलिम पठाण राजू उमप तसेच पालक बहुसंख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खुशाल चव्हाण, रायभान रक्ते, कमलाकर काळे, सुनील पवार, श्रीम विश्रांती सलगरे, अप्पासाहेब किसवे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले. प्रास्ताविक रामनाथ धनवे सर यांनी केले मान्यवराचे आभार श्रीधर जऱ्हाड सर यांनी मानले शालेय पोषण आहार अंतर्गत याप्रसंगी विद्यार्थ्यांना गोड भात देण्यात आला.

## जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे गुलाब पुष्प देऊन प्रवेशोत्सव साजरा



सोयगाव,दि.१६ जून : उपक्रमशील शाळा जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे शाळेच्या पहील्या दिवशी नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचे स्वागत तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,केंद्र प्रमुख फिरोज तडवी,नगरसेवक गजानन कुडके,मनोज आगे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती,समाजसेवक राजू कुडके,शिक्षण प्रेमी योगेश बोखारे,उपाध्यक्षा वैशाली पवार,सदस्या मनिषा जेठे,शंकर जेठे याच्या हस्ते पाठ्यपुस्तक,गणवेश,बुट,सॉक्स,व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी शाळेतील सर्वच विद्यार्थ्याना पाठ्यपुस्तक,गणवेश,बुट,सॉक्स मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्याच्या चेहर्यावर दिसून येत होता.सकाळी शालेय परीसर,काळेनगर,रामजीनगर येथे विद्यार्थ्याची प्रभात फेरी मान्यवराच्या उपस्थित काढण्यात आली. विद्यार्थ्याना मध्यान्ह भोजन योजने मध्ये गुळाची जिलेबी व खिचडी पुलाव देण्यात आला.यावेळी शाळेत उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंड वर विद्यार्थ्यानी व मान्यवरांनी सेल्फी काढून विद्यार्थ्याच्या आनंदात सहभाग नोदविला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी,तसेच प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.

# सावकाराच्या जाचाला कंटाळून एकाने घर सोडले, पत्नीची पोलीसात तक्रार



गंगापूर दि.१६ :
माझे पती घर सोडून निघून गेले असून त्या अद्याप पर्यंत परत न आल्याची तक्रार त्यांच्या पत्नीने गंगापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

याविषयी त्यांची पत्नी ज्योती दिलीप पचपिंड (वय ३६) रा. जाखमाथवाडी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजी नगर यांनी दिलेलं तक्रारीत म्हटले आहे की शनिवार (ता.१४) रोजी माझे पती दिलीप बाबासाहेब पचपिंड (वय ४०) हे रात्री साडेआठ वाजेपर्यंत घरी न आल्यामुळे मी त्यांना जेवणासाठी या असा फोन केला असता मी घरी नंतर येतो असे सांगून घरातून निघून गेले आहे. ते अद्याप पर्यंत आले नाही त्यांची माझे नातेवाईक, आप्तेष्ट, परिसरातील आजूबाजूच्या लोकाकडे शोध घेतला परंतु अद्याप पर्यंत ते मिळून आले नाही. मी व ते शेती काम करून उपजीविका करतो त्यांच्या अंगात फिकट निळा रंगाचा टी-शर्ट, काळ्या रंगाची नाईट पॅन्ट, चेहरा गोल वर्ण गोरा असून त्यांची उंची पाच फूट पाच इंच आहे. त्यांच्याजवळ मोबाईल नाही पायात काळ्या रंगाची चप्पल असून मराठी भाषा ते बोलू शकता.अशी तक्रार त्यांनी दिले आहे.

पोलिसांनी याविषयीची तक्रार घेऊन त्यांचा शोध सुरू केला आहे दरम्यान गंगापूर व जाखमाथा परिसरात तालुक्यातील मोठे शेतीचे व्यवसाय करणारे म्हणून दिलीप पाचपिंड यांची फार मोठी ओळख आहे. त्यामुळे त्यांचे घरातून निघून जाण्यामागे मोठी उलट सुलट चर्चा गंगापूर शहर व परिसरात पसरले असून सावकारीचे देणे घेणे यांना कंटाळून ते घरातून निघून गेले असल्याचे चर्चा सर्वत्र पसरली आहे. याविषयी पुढील तपास गंगापूर पोलीस करीत आहे.

# अंतोदय योजनेतून धान्य वाढवून द्यावे यासाठी अब्दुल सत्तार यांची मंत्री छगन भुजबळ यांना भेट

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१६, सिल्लोड तालुक्यासाठी झक्क व अंत्योदय योजनेचे धान्य ( इष्टांक ) वाढवून देण्यात यावा यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी मुंबई येथे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ यांची भेट घेऊन याबाबतचे पत्र दिले. दरम्यान याप्रसंगी सिल्लोड - सोयगाव मतदारसंघातील पुरवठा विभाग अंतर्गत विविध विषयांवर आमदार अब्दुल सत्तार यांनी ना. छगन भुजबळ यांच्यासोबत चर्चा केली.



सिल्लोड - सोयगाव तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या पुरवठा योजनेचा लाभ घेता यावा यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे पाठपुरावा केला. सिल्लोड तालुक्यात स्वस्त धान्यचा इष्टांक शिल्लक नसल्याने तालुक्यातील गोरगरीब गरजू, दिव्यांग व विधवा निराधार महिला यांना सध्यास्थिती राशन मिळत नसून सिल्लोड तालुक्यात झक्क व अंत्योदय योजनेचा इष्टांक (धान्य) वाढवून मिळाले तर तालुक्यातील गोरगरीब गरजू, दिव्यांग व विधवा निराधार महिला यासारख्या पात्र लाभार्थ्यांना उपासमारीची वेळ येणार नाही.असे आमदार अब्दुल सत्तार यावेळी झालेल्या चर्चा दरम्यान म्हणाले. यासाठी सिल्लोड तालुक्यासाठी झक्क व अंत्योदय चे राशनकार्डचा इष्टांक (धान्य) वाढवून देण्यात यावा असे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले.

यावर मंत्री छगन भुजबळ यांनी सकारात्मक भूमीका घेत यासाठी आवश्यक कारवाई करू अशी ग्वाही देत अन्न व नागरी पुरवठा विभाग अंतर्गत एकही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही यासाठी अधिकाऱ्यांना निर्देशित करणार असल्याचे मंत्री छगन भुजबळ म्हणाले.

# संत चोखामेळांच्या विचारांचे आचरण, आनंदी जीवनात वाढ करते-ज्ञानदास डॉ.विजयकुमार फड

छत्रपती संभाजीनगर - संत श्री चोखोबारायांनी व त्यांच्या कौटुंबिक सदस्यांनी लिहिलेल्या अभंगांचे व त्यांच्या आचार विचारांचा अवलंब करणाऱ्यांच्या जीवनात कसल्याही प्रकारच्या नकारात्मक बाबींच तसेच मानसिक व वैचारीक रोगाचा शिरकाव होऊ शकत नाही आणि आपोआप अशांच्या जीवनातील आनंदात वाढ होते, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.



संत चोखामेळा अध्यासन केंद्रातर्फे आयोजित संत चोखोबांच्या विचार प्रसार कार्यातील समतावादी वारकऱ्यांचा कृतज्ञता स्वागत सोहळा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. फड बोलत होते. त्यांनी याप्रसंगी संत चोखोबाराय, सोयरामाता, बंका महाराज, निर्मळा माता तसेच कर्मामेळा महाराजांच्या साहित्यावर आपल्या भावना व्यक्त केल्या. संत चोखामेळांच्या गाथेचा अभ्यास केल्यास महाराजांनी अंधश्रध्दा, काम, क्रोध, मत्सर, व्देष, अहंकार, मीपणा अशा सहजासहजी नष्ट न होणाऱ्या व मानवाला आणि पर्यायाने समाजाला रोगग्रस्त करणाऱ्या बाबींवर प्रचंड प्रहार केल्याचे निदर्शनास येते हे त्यांनी सोदाहरण सांगितले. महाराजांची गाथा समजून घेणारा व्यक्ती नकारात्मक मनोवृत्ती, वैचारिकता आणि चुकीच्या वृत्तीतून पूर्णत: बाहेर पडतो. त्यामुळे न दिसणाऱ्या; पण व्यक्तींवर आणि पर्यायाने समाजावर विपरित परिणाम करणाऱ्या मानसिक व वैचारीक रोगांवर आपोआप प्रतिबंध बसून माणूस अशा रोगांपासून मुक्त होऊन आनंदी जीवन जगतो. अर्थात, महाराजांची गाथा माणसाला स्वार्थ, अहंकार, इर्षा, तणाव, क्रोध, नकारात्मक दृष्टी अशा रोगातून मुक्त करते. त्यामुळे संत चोखामेळांची गाथा म्हणजे निरोगी समाजाचे प्रतिबिंब व निरोगी समाज निर्मितीचा आधारस्तंभ होय, असेही फड म्हणाले. यावेळी प्रा. संतोष तांबे, प्रा. विठठल जायभाये, ड महारुद्र जाधव, डॉ. रामकिशन दहिफळे, या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. गणेश मोहिते, प्रा. डॉ.विठठल गाडेकर प्रा. डॉ. प्रफुल्ल देवरे, महादेव महाराज रोकडे, भगवान खराडे आदी मान्यवर उपसिथत होते. संत चोखामेळा अध्यासन केंद्र, पुणेचे संस्थापक श्री सचिन पाटील यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. डॉ. फड यांचे यावेळी लोकमाता अहिल्याबाई होळकर चरित्र आणि कार्य, तुकाराम नीती, संत सोयराबाई व्यकितत्व आणि कर्तृत्व हे ग्रंथ देऊन स्वागत करण्यात आले.

# देशभरात राष्ट्रीय सर्जन वीक उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि.१५ : असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाच्यावतीने 'सर्जन्स वीक' हा राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम रविवार, दिनांक ८ जून ते रविवार, दिनांक १५ जून २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला असल्याची माहिती असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडियाचे (एएसआय) अध्यक्ष डॉ.प्रविण सूर्यवंशी यांनी आज येथे दिली.

यावेळी, डॉ.मधुमिता मुखोपाध्याय, डॉ. प्रबल नेवगी, डॉ. मूर्दू पांडियन, डॉ.दिवाकर रेड्डी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

दरवर्षी १५ जून रोजी 'राष्ट्रीय सर्जन्स दिवस' साजरा केला जातो. यावर्षी प्रथमच सर्जन्स वीक साजरा करण्यात आला. हा वीक साजरा करण्यामागचा उद्देश सर्जन्सच्या योगदानाचा सन्मान करणे, जनजागृती घडवणे आणि नव्या पिढीला प्रेरित करणे हा होता. आज हयात हॉटेल येथे सर्जन्स वीकचा समारोप समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यामध्ये देशभरातील सर्जन्स सहभागी झाले होते. यावेळी सर्जन्स यांनी गायन स्पर्धेत सहभागी होत गाणी सादर केली.

सर्जन्स वीक दरम्यान देशभरात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, मॅरेथॉन, वॉकेथॉन,जनजागृती मोहीमा, मोफत शस्त्रक्रिया, सार्वजनिक व्याख्याने, सर्जन्ससाठी आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, शाळांमध्ये आरोग्य विषयक उपक्रम, सर्जन्सच्या कुटुंबीयांसाठी कार्यक्रम तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले गेले. देशभरात सुमारे १० हजार लोकांनी या उपक्रमात भाग घेऊन रक्तदान केले आहे.

सर्जन्स हे केवळ वैद्यकीय शस्त्रक्रिया करणारे तज्ञ नसून ते समाजासाठी आरोग्य रक्षक म्हणून कार्य करतात. त्यांच्या अचूकतेने, चिकाटीने आणि सेवाभावी वृत्तीने अनेकांचे जीव वाचवले जातात. एएसआय ही भारतातील सर्वांत मोठी सर्जन्सची संस्था असून, ३८,००० हून अधिक सर्जन्स संस्थेचे सदस्य आहेत. संस्थेचे मुख्यालय चेन्नई येथे असून देशभरातील सर्व राज्यांतील सर्जन्स या संस्थेशी जोडलेले आहेत.

एएसआयच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशभरात विविध शाखा, विभाग आणि शहरांमध्ये सर्जन्सना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. आपली सामाजिक बांधिलकी जपत देशभरातील सर्जन्सनी सर्जन्स वीकमध्ये आपले अमूल्य योगदान देत काम केले आहे.

# पंजाबराव मोरे यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' प्रदान

छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी)- येथील 'दैनिक सामना'चे ज्येष्ठ पत्रकार पंजाबराव गोविंदराव मोरे यांना राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्रालयाच्या वतीने प्रतिष्ठेचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे.




मुंबईतील नरीमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, जलसंधारण मंत्री संजय राठोड, रोहयोमंत्री भरत गोगावले आणि विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देऊन मोरे यांना सपत्नीक गौरविण्यात आले.

पत्रकारिता, अध्यापन, समाजकार्य, लोककला, गायन, साहित्यनिर्मिती, नाट्यकला, चित्रपट-मालिका अभिनय, वादन आणि पेन्टिंग आदी क्षेत्रांतील योगदानाबद्दल पंजाबराव मोरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यापूर्वी मोरे यांना राज्य शासनाच्या 'गुणवंत कामगार कल्याण पुरस्कारा'सह अनेक मान्यवर संस्थांकडून विविध क्षेत्रांतील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. वयाच्या दहाव्या वर्षांपासून गायन आणि लोककलेच्या मंचावर त्यांनी कलापथकाच्या माध्यमातून विविध सामाजिक विषयांवर लेखन व सादरीकरण तसेच शासनाच्या दारुबंदी, हुंडाबंदी, बालविवाह, व्यसनमुक्ती, प्रौढशिक्षण, महिला सबलीकरण या विषयांवर खेडोपाडी जनजागृती केली आहे.

१९८२ मध्ये बारावीत शिकत असताना सैलानी येथील गाजलेल्या बबिता सोमाणी प्रकरणावर २६ कडव्यांचा पोवाडा लिहून गावागावात पलित्यांच्या उजेडात सादर करून महिलांमध्ये जनजागृती केली होती. पुढे शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे आल्यानंतर लोककला अकादमीच्या माध्यमातून आकाशवाणीवर गीते सादर केली. त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पंधरा देशांच्या कलाकारांपुढे महाराष्ट्राच्या लोककलांचे सादरीकरण केले आहे. 'नोटबंदी', 'भारतीय संविधान' आणि 'मराठवाडा मुक्तीसंग्राम' या विषयांवर देशात पहिल्यांदा पोवाडा सादर करण्याचा मान मिळविला आहे.

पेन्टिंगच्या क्षेत्रात पोर्टेट पेन्टिंग, होर्डिंग, वॉलपेन्टिंगच्या कामानिमित्त त्यांनी जवळपास १२ राज्यांत भ्रमंती केली आहे. असे बहुआयामी व्यक्तीमत्व असलेले मोरे यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल 'दैनिक सामना' परिवार, स. भु. शिक्षण संस्था परिवार, पेन्टर्स असोसिएशनचे सहकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू

छत्रपती संभाजीनगर - उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू १८ जून रोजी त्यांचा नवीन फोन आईकू ज़ेड१० लाइट ५जी लाँच करणार आहे. हा फोन विशेषतः विद्यार्थ्यांसाठी आणि सक्रिय जीवनशैली असलेल्या लोकांसाठी डिझाइन केला आहे. आईकू ज़ेड१० लाइट तुमची दैनंदिन कामे सहजपणे हाताळू शकते-मग ती ऑनलाइन वर्गात जाणे, मित्र आणि कुटुंबाशी जोडलेले राहणे, व्हिडिओ पाहणे, रील्स स्क्रोल करणे, प्रवासात गेम खेळणे किंवा एकाच वेळी अनेक ॲप्स वापरणे असो. हे दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि जलद ५जी कनेक्टिव्हिटी देते, ज्यामुळे तुम्ही दिवसभर कोणत्याही व्यत्ययाशिवाय अभ्यास आणि मनोरंजनाचा आनंद घेऊ शकता. शक्तिशाली ६०००एमएएच बॅटरीने सुसज्ज, ज़ेड१० लाइट ५जी फोनला अवजड न बनवता तुम्हाला जास्त काळ कामगिरी देतो. आईकू ज़ेड१० लाइट हा देखील त्याच्या सेगमेंटमधील सर्वात मोठी बॅटरी असलेला ५ जी स्मार्टफोन आहे. वर्गात जाणे असो, असाइनमेंट पूर्ण करणे असो, कंटेंट ब्राउझ करणे असो किंवा मित्रांसोबत संपर्कात राहणे असो - त्याची बॅटरी दिवसभरातील विविध गरजा सहजपणे पूर्ण करू शकते.

## इसुझू मोटर्स इंडियाने सर्व्हिस नेटवर्क केले अधिक बळकट

छत्रपती संभाजीनगर : इसुझू मोटर्स इंडिया ने आज महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे दिवेकर ऑटो प्रा. लि. (डीएपीएल) या नवीन अधिकृत सेवा केंद्राचे उद्घाटन केले. महाराष्ट्रभर सेवा विस्ताराच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. रेल्वे स्टेशन रोडवरील कोकणवाडी चौकात असलेल्या दिवेकर प्लाझामध्ये हे सर्व्हिस सेंटर मोक्याच्या जागी असून मराठवाडा परिसरातील ग्राहकांसाठी, विशेषतः औद्योगिक भागांतील ग्राहकांसाठी, सहज पोहोचण्याजोगे आहे. या सर्व्हिस सेंटरच्या उद्घाटन समारंभास इसुझू मोटर्स इंडियाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि डीएपीएलचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

## युग्रो कॅपिटलचे दुप्पट विस्तारीकरण

छत्रपती संभाजीनगर - : एमएसएमई क्षेत्रासाठी कर्ज वितरणावर आपले लक्ष केंद्रित करणारी आघाडीची डेटाटेक एनबीएफसी कंपनी युग्रो कॅपिटलने महाराष्ट्रात २० हून अधिक नवीन शाखा उघडण्याची घोषणा केली आहे. वित्तीय समावेशनाला चालना देणे तसेच एमएसएमई क्षेत्रातील अखरेच्या घटकापर्यंत कर्ज वितरणाप्रती कंपनीची वचनबद्धता या घोषणेमुळे आणखी दृढ झाली आहे. या धोरणात्मक विस्तारामुळे युग्रो कॅपिटलच्या महाराष्ट्रातील शाखांची संख्या ४२ वर झेपावली आहे. तसेच युग्रोसाठी महाराष्ट्र हे सर्वाधिक शाखा असणारे राज्य ठरणार आहे. अहमदनगर, औरंगाबाद, जळगाव, नाशिक, संगमनेर, कल्याण, पनवेल, पिंपरी बारामती, भंडारा, ब्रह्मपुरी, चंद्रपूर, गोंदिया, खोपोली, कोल्हापूर, पांडरगवडा, पेण, रत्नागिरी, सांगली आणि वाघोली येथे युग्रोने नवीन शाखा उघडलेल्या आहेत. या भागातील एमएसएमई उद्योगांच्या कर्जाच्या गरजा पूर्ण करण्यावर या शाखा भर देणार आहेत. वित्तसहाय्यापासून वंचित असलेल्या एमएसएमईंना परवडणारे कर्ज उपलब्ध करून देणे तसेच व्यवसाय वृध्दी साध्य करण्याचे युग्रो कॅपिटलचे ध्येय या कृतीतून उलगडते.

## गुणवत्ताआधारित शिष्यवृत्तींची घोषणा

छत्रपती संभाजीनगर - - राष्ट्रीय अस्मिता, प्रगती आणि एकत्मिता यांचे दर्शन घडविणारा 'रशिया दिन' साजरा करण्यास रशियन जनता सज्ज झाली असताना रशियन सरकारच्या अनेक विद्यापीठांनी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ताआधारित शिष्यवृत्ती जाहीर केली आहे. अत्यंत महत्वाच्या अशा या शैक्षणिक घोषणेमुळे भारतातून रशियामध्ये एमबीबीएस पदवी शिक्षण घेण्यास सज्ज असलेल्या विद्यार्थ्यांना मोठी संधी प्राप्त होणार आहे. या उपक्रमातून रशिया दिनाच्या निमित्ताने त्या देशातील स्पिरीट समोर येते आणि त्याचवेळी रशिया आणि भारत यांच्यातील दीर्घकालीन परस्परसंबंधही अधोरेखित होतात. या घोषणेमुळे भारतीय विद्यार्थ्यांना किफायतशीर, जागतिक स्तरावर मान्यता पावलेले आणि उच्च दर्जाचे वैद्यकीय शिक्षण प्राप्त होणार आहे. २०२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून अर्ज स्वीकारले जात आहेत. विद्यार्थ्यांनी गुणवत्ताआधारित शिष्यवृत्तीसाठी आणि आपल्या आवडीच्या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी त्वरा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तो फारच शांत आणि सुंदर क्षण होता

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाचे काम करणारी करुणा पांडे बऱ्याचदा पडद्यावर आणि प्रत्यक्षात देखील मूक ताकदीची क्षमता अनुभवत असते. आपल्या व्यक्तिरेखेनुसार, करुणा देखील आयुष्यातील छोट्या छोट्या क्षणांचा आनंद घेण्यात मानते आणि आणि पहिल्या पावसाइतका हा अनुभव कधी येणार? या पवसाळ्यातील पहिल्या पावसाची आठवण काढत करुणा म्हणते की क्वचितच असणाऱ्या युनिट-ऑफ च्या दिवशीच बरोबर पावसाने संधी साधली! मला पहिला पाऊस आठवतो आहे... मी घरीच होते, संध्याकाळच्या वेळी मी माझ्या कुत्र्यांशी खेळत होते आणि एकीकडे चहाचा आनंद घेत होते. अचानक पाऊस आला, सोसाट्याचा वारा वाहू लागला आणि मग मुसळधार पाऊस कोसळू लागला. सगळी सृष्टी कशी एकदम टवटवीत होऊन गेली!

## मनदीप कौरने धारण केला पारंपरिक लूक

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'वसुधा'ने आपल्या भावनिक कथानक आणि अनपेक्षित वळणांसह प्रेक्षकांना गुंतवून ठेवले आहे. हल्लीच एका भागात प्रेक्षकांनी एक लक्षवेधी रूपांतर पाहिले - मेघा (मनदीप कौर) एका राजेशाही राजस्थानी वधूप्रमाणे अवतरली. कथानकात एका ॲड शूटच्या निमित्ताने आलेला हा प्रसंग सांस्कृतिक रंगत घेऊन आला आणि मेघाचा हा नवा अवतार सौंदर्य व शान यांचा उत्तम मिलाफ होता.मनदीप कौरने पहिल्यांदाच स्क्रीनवर राजस्थानी नववधूची भूमिका साकारली आणि तिचे रूप अगदी राजेशाही भासत होते. गडद मरून रंगाच्या लेहंग्यावर बारकाईने केलेली सोनेरी नक्षीकाम, भरजरी चोळी आणि पारंपरिक राजस्थानी ड्रेसिंग स्टाइलमधील दुपट्टा यांसोबतच्या कुंदन दागिन्यांसह तिचा लूक अगदी खुलून आला .

## नांदेडचे समर्थ एअर १५८१ मिळवून टॉप स्कोरर बनले

नांदेड : चाचणी तयारी सेवांमध्ये राष्ट्रीय अग्रणी आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड अभिमानाने जाहीर करते कि नांदेड येथील समर्थ यांनी अत्यंत स्पर्धात्मक नीट यूजी /२०२५ परीक्षेत ऑल इंडिया रँक/१५८१ साधून टॉप स्कोरर ठरले आहेत. हे अपवादात्मक यश विद्यार्थ्यांच्या समर्पणाचे, शैक्षणिक शिस्तीचे आणि एईएसएल कडून दिलेल्या विश्वस्तरीय कोचिंग व मार्गदर्शनाचे प्रतीक आहे. या निकालाची अधिकृत घोषणा राष्ट्रीय चाचणी एजन्सी यांनी काल केली. विद्यार्थी एईएसएल च्या क्लासरूम प्रोग्राम मध्ये सहभागी होते, जे विशेषतः नीट सारख्या आव्हानात्मक वैद्यकीय प्रवेश परीक्षेची तयारी करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. त्यांनी आपली ही यशोगाथा एईएसएल ने दिलेल्या मजबूत शैक्षणिक पाया, स्पष्ट संकल्पना, आणि नियमित व शिस्तबद्ध अध्ययन दिनचर्येला श्रेय दिले. मी पुर्ण अंतःकरणाने आकाशचा आभारी आहे, ज्यांनी या पूर्ण प्रवासात मला मार्गदर्शन केले.

**ई-निविदा सूचना**

मु.ता.ए. सोसायटीचे श्रीमती. जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर, ता.-मु.नगर, जिल्हा-जळगाव-४२५३०६ महाविद्यालयासाठी PM-USHA अंतर्गत आयटी उपकरणांसाठी नोंदणीकृत पुरवठादारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा सूचना, तांत्रिक माहिती, अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या पोर्टलवर उपलब्ध असून सदरची ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाची आहे. तसेच सदरची ई-निविदा महाविद्यालयाच्या संकेत्तस्थळावर Website: www.sggkhadsecollege.ac.in फक्त माहितीस्तव उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परिपूर्णरित्या भरलेली ऑनलाईन स्वरूपातील ई-निविदा दि. २५/०६/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी जमा करावी. सदरची ई-निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ दिल्यास अथवा शुध्दीपत्रक निर्गमित केल्यास त्या संबंधीची सूचना वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जा. क्र.:९२/२०२५-२६
दिनांक :१६/०६/२०२५

प्राचार्य

## अग्रलेख...

# जग आर्थिक संकटाच्या दिशेने...

युद्ध केवळ सैन्यातील मुंडकी आणि शस्त्रांच्या बळावर जिंकणे शक्य असते तर औरंगजेबाने महाराष्ट्र अवघ्या काही महिन्यांमध्ये जिंकला असता. स्वत:ला आलमगीर म्हणवून घेणारा हा दिल्लीचा बादशहा महाराष्ट्र तर सोडा सह्याद्रीतील एक किल्लाही कायमस्वरूपी जिंकू शकला नाही. उलट, कोट्यवधी रुपयांचा चुराडा करून आणि हजारो मुघली सैनिकांचे बळी देऊनही औरंगजेब मराठ्यांचं काहीही वाकडं करू शकला नाही. जवळपास २७ वर्षे महाराष्ट्रात ठाण मांडून मराठ्यांवर युद्ध लादले पण सरतेशेवटी या आलमगीराला येथील मातीतच मिसळावे लागले. मुघलांचा सेनासंभार होता तो लाखांचा, तर मराठे होते काही हजारांमध्ये. अवघ्या हिंदुस्थानातून औरंगजेबापुढे पैशाच्या राशी ओतल्या जात होत्या तर मराठ्यांना कर्ज काढून लढावे लागले. एवढे सारे असूनही मराठे का जिंकले आणि आलमगीर का पराभूत झाला? मराठे सत्यासाठी, स्वसंरक्षण, स्वाभिमानासाठी आणि अन्यायाविरोधात लढत होते, तर मुघल अधर्माच्या मार्गाचा अवलंब करीत महाराष्ट्राला चिरडून टाकण्यासाठी मैदानात आले होते. पण, मराठ्यांनी सत्याच्या मार्गाचा अवलंब करीत मुघलांसारखे क्रौर्य न करताही औरंगजेबाला पराभूत केले. साधनसामुग्री आणि प्रचंड सैन्यदल असले तरच युद्ध जिंकता येते, हा समज मराठ्यांनी ४०० वर्षांपूर्वीच फोल ठरविला. जगात सातत्याने कुठे ना कुठे युद्ध सुरूच असतात.

अगदी अतिप्राचीन काळ असो वा आधुनिक, असे एकही शतक अथवा दशक गेले नसेल जेथे युद्ध-लढाया झाल्या नसतील. मध्यपूर्व आणि अरब देश तर भांडखोर होते आणि आताही आहेतच. या रानटी, अमानुष देशांनी अनेक संपन्न संस्कृती आणि देश नष्ट केले. रक्ताचे पाट वाहिले. धर्मच नष्ट केले. जगाच्या पाठीवर असा एकही देश नसेल की ज्याची झळ, भूतकाळात असो वा वर्तमानात बसली नाही. भारताचे झालेले नुकसान तर कधीही भरून न निघणारे आहे. आताही मध्यपूर्वेत इराण आणि इस्रायल यांच्यात शुक्रवारपासून भीषण संघर्ष पेटला आहे. दोन्ही देशांनी आतापर्यंत एकमेकांवर शेकडो क्षेपणास्त्रे, अग्निबाण, ड्रोन्स आणि लढाऊ विमानांनी घातक बॉम्बचा वर्षाव केला आहे. इराणमध्येही कधीकाळी संपन्न अशी संस्कृती नांदत होती. येथील नागरिकही निसर्गाची, सूर्याची पूजा करीत होते. पण, इस्लामी आक्रमकांच्या पायाखाली पारशी जनता चिरडली गेली. आज हा देश चिमुकल्या इस्रायलचा सर्वनाश करण्याचे स्वप्न पाहतो आहे. मध्यपूर्वेतील या दोन्ही देशांच्या संघर्षात आपोआप अनेक जण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ओढले जात आहेत. वास्तविक पाहता इराण आणि इस्रायल यांच्यात जमिनीवरील अंतर २३०० किलोमीटरचे एवढे आहे. अर्थातच दोन्ही देश थेट मैदानावर एकमेकांशी भिडणे अशक्य आहे. असे थेट युद्ध झाल्यास इस्रायलचा निभाव लागणारच नाही. कारण इस्रायलची सक्रिय सैन्यसंख्या आहे ती अवघी १ लाख ७० हजार, तर इराणची आहे सहा लाखांच्या वर. लोकसंख्येच्या बाबतीतही तुलना नाही. इराणची लोकसंख्या आहे तब्बल ९ कोटी, तर इस्रायलची आहे ९८ लाखांच्या आसपास. सैन्यदळ आणि लोकसंख्या यांच्यात एवढी तफावत असूनही इस्रायल तब्बल पाच मुस्लिम देशांच्या गराड्यात असतानाही अंगदासारखा घट्ट पाय रोवून उभा आहे. सीरिया, लेबनान, फिलिस्तीन, जॉर्डन, इजिप्त या मुस्लिम देशांच्या सीमा थेट भिडलेल्या आहेत. यातील जॉर्डन आणि इजिप्त या दोन देशांसोबत इस्रायलचे संबंध ठिकठाक आहेत तर फिलिस्तीन, सीरिया आणि लेबनान यांच्याशी उघड शत्रुत्व आहे. सध्या इस्रायल एकाचवेळी हमास (फिलिस्तीन), सीरिया, लेबनान, इराण, येमेन, या देशांसोबत निकराचा लढा देत आहे. पण, हमासबरोबर सीरिया आणि लेबनान या देशांची युद्धक्षमताच नष्ट केल्यानंतर इस्रायल डिफेन्स फोर्सने इराण, कतारच्या बळावर वळवळ करणाऱ्या येमेनची नांगी ठेचली. सीमेवरील शत्रूला पुरते घायाळ केल्यानंतर इस्रायलने मोर्चा वळविला तो इराणकडे. इराणवर नेत्यानाहूंची विमाने आग ओकत असताना इतर मुस्लिम देशांना तेहरानचा होत असलेला विनाश पाहण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. अर्थात इस्रायलच्या शिरावर अमेरिकेसह ब्रिटन, फ्रान्ससह बहुतांश नाटो देशांचा वरदहस्त आहे. खाडी देशांमधील कतार, बहरीन, सौदी अरेबिया सारख्या मुस्लिम देशांमध्ये अमेरिकेचे ४० हजार खडे सैन्य तैनात आहे. इराणकडे हजारो बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा साठा आहे. जोडीला अणुबॉम्ब बनविण्याच्या जवळ इराण आला असल्याची जाणीव अमेरिका आणि इस्रायलला झाली. कारण, या अणुबॉम्बचा सर्वाधिक धोका आहे तो अमेरिकेचे खाडी देशातील लष्करी तळ आणि इस्रायलला. यहुदींचा सर्वनाश आम्ही करू, असा इशारा इराण वारंवार देत असतो. इराणच्या अणुबॉम्बचा काटा कायमस्वरूपी उखडून फेकण्यासाठी इस्रायलच्या लढाऊ विमानांनी थेट इराणमध्ये घुसून नातांझ, इस्फाहन आणि फार्दो या तीन आण्विक तळांवर हल्ले करून ते निकामी केले. नातांझ येथे जमिनीखाली तयार केलेल्या तीन शक्तिशाली इमारतींमध्ये ५० हजार सेंट्रिफ्यूज असल्याचा दावा केला जात आहे. या तीनही आण्विक तळांवर केलेल्या हल्ल्यांत आण्विक सुविधा नष्ट झाल्या असून नऊ अणुशास्त्रज्ञ मारले गेल्याची चर्चा आहे. शुक्रवार हा मुस्लिमांसाठी पवित्र दिवस आहे. याच दिवशी इस्रायलच्या २०० लढाऊ विमानांनी राजधानी तेहरानसह इराणवर भीषण हल्ले चढविले. युद्धाच्या नियमांचे पालन करीत इस्रायलचे हल्ले केवळ लष्करी आणि आण्विक तळांवर होते. पण, शनिवारी इराणने इस्रायलच्या नागरी वस्त्यांवर शेकडो क्षेपणास्त्रांनी मारा केला. ज्यामध्ये तीन नागरिकांचा मृत्यू झाला तर अनेक घरांचे नुकसान झाले. गेल्या दीड वर्षांपासून इराण आमच्याविरोधात छुप्या युद्धाचा अवलंब करीत असून सीरिया, हमास, इराक, लेबनान आणि येमेनमधील हुती दहशतवाद्यांना शस्त्रे आणि पैशाची मदत करीत असल्यानेच आम्हाला हल्ले करावे लागल्याचे इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी स्पष्ट केले. प्रतिशोध आणि सूडाच्या भावनेने पेटलेल्या इराणने जर इस्रायलच्या नागरिकांना लक्ष्य करण्याचे अवसानघातकी पाऊल उचलले तर त्याचे गंभीर परिणाम होऊन दोन्ही देशांना विनाशकारी परिणामांना सामोरे जावे लागू शकते. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षाची धग 'ऑपरेशन सिंदूर' केवळ स्थगित केल्याने अजूनही कायम आहे. आर्मेनिया-अझरबेझान यांच्यातील संघर्ष संपतो न संपतो तोच युक्रेन आणि रशियातील युद्ध सुरू झाले. या युद्धाचा फटका भारतासह जगातील अनेक देशांना बसत आहे. तीन वर्षांपासून हे युद्ध सुरू असून यामध्ये हजारो नागरिकांचा मृत्यू झाला तर आर्थिक नुकसानीची मोजदाद अशक्य आहे.

इराण हा कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा जगातील मोठा उत्पादक आहे. भारत चाबाहारमार्गे इंधनाची मोठी आयात इराणकडून करतो. तर जगात होणाऱ्या एकूण निर्यातीपैकी २० टक्के निर्यात होर्मूझ खाडीतून होते. इराणने जर इंधनाची जहाजे रोखून धरली तर भारत आणि चीनची मोठी पंचाईत होणार आहे. युरोपातही इंधनाची तीव्र टंचाई निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. युरोपातील देश सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिरात या तेल उत्पादक देशांमधून कच्चे तेल आणि वायू इंधनाची आयात करतात. इंधन भरून जाणारी जहाजे इराणच्या होर्मूझ खाडीतूनच जातात. खाडीतून होणारा व्यापार बंद झाल्यास जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम होऊन इंधनाचे दर गगनाला भिडू शकतात. या दोन्ही देशांच्या युद्धाकडे विजय अथवा पराभवाच्या दृष्टिकोनातून न पाहता जागतिक हिताला प्राधान्य देणे गरजेचे आहे. पहिले आणि दुसरे महायुद्ध, शीतयुद्ध, दहा वर्षे चाललेले खाडी युद्ध, युक्रेन-रशिया संघर्ष याचे विपरीत परिणाम जगाच्या अर्थव्यवस्थेवर झाल्याचा इतिहास आहे. अशा संघर्षांचा सर्वाधिक फटका भारतासारख्या विशाल लोकसंख्या असलेल्या देशांना बसतो. त्यामुळे इस्रायल-इराण संघर्ष जेवढ्या लवकर संपेल तेवढे जगाच्या हितासाठी योग्य राहील. अन्यथा जगाच्या उंबरठ्यावर आणखी एक आर्थिक संकट उभे राहील. मनुष्यहानी होईल ती वेगळीच.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# स्वस्त तेल महागात पडले!

रशिया-युक्रेन युद्ध सुरू होण्यापूर्वी भारत आपल्या एकूण तेल आयातीपैकी केवळ एक टक्का तेल रशियाकडून आयात करीत होता आणि नुकत्याच संपलेल्या मे महिन्यात भारताने एकूण तेल आयातीपैकी ४० टक्के आयात रशियाकडून केली. म्हणजे भारताची आयात ३९ टक्के वाढली आणि हेच ३९ टक्के भारताला महागात पडले. रशियाने आपले कच्चे तेल स्वस्त दरात भारतात विकले. भारताने ते घेतले आणि हे स्वस्त मिळणारे कच्चे तेल भारताला फारच 'महागात' पडले असे आता दिसत आहे. नुकत्याच झालेल्या भारत-पाक चकमकीत अमेरिका व युरोपातील देशांची तटस्थता व आखाती देशांची पाक समर्थक भूमिका पाहता हा निष्कर्ष काढला जात आहे.

**आखाती देश :** भारत आजवर आखाती देशांमधून कच्चे तेल आयात करीत होता. यात सौदी अरेबिया, इराण, इराक यांचा समावेश होता. आंतराराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा जो भाव राहात असे त्या दरात भारताला हे तेल मिळत असे. यात इराणकडून मिळणारे तेल काहीसे स्वस्त राहात असे. याशिवात इराणकडून तेल विकत घेताना, भारताला काही महिन्यांची उधारीची सवलत मिळत असे.

**युक्रेन युद्धानंतर :** रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर अमेरिका व युरोपातील देशांनी रशियाची आर्थिक कोंडी केली. या कोंडीत रशियाला तारले ते दोन देशांनी. भारत व चीन यांनी. रशिया भारताचा मित्र. अनेक प्रसंगी त्याने भारताला मदत केली आहे. त्यामुळे रशिया अडचणीत आला असताना भारताने त्याच्या मदतीस धावून जाणे स्वाभाविकच होते. रशियाजवळ विकण्यासाठी दोनच वस्तू आहेत. एक शस्त्रास्त्रे आणि दुसरे म्हणजे कच्चे तेल. भारताने आजवर काही लाख कोटी रुपयांची शस्त्रास्त्रे रशियाकडून खरेदी केली आहेत. मिग विमानांपासून तो सुखोई विमानापर्यंत, विमानवाहू युद्धनौकेपासून तो एके-४७ रायफलीपर्यंत. सर्व प्रकारची शस्त्रास्त्रे रशियाने भारताला विकली आहेत. ॲडमिरल गोर्शाचोव्ह ही विमानवाहू युद्धनौकाही भारताने रशियाकडून विकत घेतली. एक काळ होता भारत अमेरिकेकडून कोणत्याही शस्त्रास्त्रांची खरेदी करीत नव्हता. नंतर भारताने त्यात बदल केला. अमेरिकेला खूष करण्यासाठी ग्लोबमास्टर व हर्क्युलस ही मालवाहू लष्करी विमाने भारताने या देशाकडून खरेदी केली. नंतर चिनाक हे हेलिकॉप्टरही अमेरिकेकडून खरेदी करण्याचा निर्णय भारताने घेतला. तोपर्यंत भारत रशियन बनवटीची हेलिकॉप्टर्स वापरीत होता. शस्त्रास्त्र खरेदीत भारताने रशिया-अमेरिका यांच्यात समतोल साधण्याचा प्रयत्न केला. पण, अमेरिकेला हे मान्य नाही असे दिसते. भारताने रशियाकडून काहीही खरेदी करू नये अशी अमेरिकेची अपेक्षा असताना, भारताने रशियाकडून तेल खरेदी करण्याचा निर्णय घेतला. याने अमेरिकेच्या संतापाचा भडका उडाला असे मानले जाते.

**भारत तिसरा आयातक :** भारत पूर्वीही रशियाकडून कच्चे तेल विकत घेत होता, पण त्याचे प्रमाण फार कमी होते. युक्रेन युद्धामुळे आर्थिक कोंडीत आलेल्या रशियाने आपले कच्चे तेल भारताला स्वस्त दरात देण्याचा प्रस्ताव मांडला. भारताने तो स्वीकारला आणि आता मागील महिन्यात म्हणजे मे- २५ मध्ये भारताने एकूण तेल आयातीपैकी ४० टक्के आयात एकट्या रशियाकडून केली अशी माहिती समोर आली आहे. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल आयात करणारा देश आहे.

**दुहेरी परिणाम :** भारताच्या या निर्णयाचे दुहेरी परिणाम झाले. अमेरिका व युरोप यांनी रशियावर लावलेले आर्थिक निर्बंध काहीसे बोथट झाले. याने अमेरिका व युरोपातील देशांचा जळफळाट झाला. म्हणजे युरोपने रशियाची आर्थिक कोंडी करण्याचा जो प्रयत्न केला, तो भारताच्या तेल आयातीने उधळला गेला.

याने अमेरिका संतप्त झाली. युरोपातील देश नाराज झाले. अर्थात भारताने हे स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी केले होते.

**अमेरिकेची नाराजी :** एका ताज्या घटनाक्रमात अमेरिकेने पाकचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांना आपल्या लष्कराच्या स्थापनेला २५० वर्षे पूर्ण होत असल्याबद्दच्या विशेष कार्यक्रमात बोलविले आहे. याने पाकिस्तानची स्थिती 'आंधळा मागतो एक आणि देव देतो दोन' अशी झाली आहे. पाकने फक्त चीनकडे पाठिंबा मागितला होता. आता तर त्याला अमेरिकाही पाठिंबा देत असल्याचे स्पष्ट होत आहे.

**आखाती देशांवरील परिणाम :** दुसरीकडे सौदी अरेबिया, इराण, अन्य आखाती देश भारतावर यासाठी नाराज झाले की, भारताने त्यांच्याकडून तेल खरेदी कमी केली. म्हणजे आंतरराष्ट्रीय तेल बाजारातील एक मोठा गिऱ्हाईक त्यांच्यापासून दूर गेला. याने हे देश संतापले. आंतरराष्ट्रीय राजकारणात मुत्सद्देगिरीची एक भाषा असते. रशियाकडून तेल आयात करण्याच्या निर्णयावर ना युरोपातील देशांनी उघडपणे आपली नाराजी नोंदविली होती ना आखाती देशांनी आपला राग व्यक्त केला होता. पण, संधी मिळताच या देशांनी भारताला धक्का दिलाच.

**भारत-पाक चकमक :** भारत-पाकिस्तान चकमक ही या देशांना सापडलेली ती संधी होती. यात चीनने पाकिस्तानने बाजू घ्यावी हे समजू शकते. पण, अमेरिका व युरोपातील देशांनी तटस्थ राहावे याला काय म्हणता येईल? अमेरिकेने तर चक्क पाकिस्तानची बाजू घेतली. संयुक्त राष्ट्रात दहशतवादविरोधी समितीचे अध्यक्षपद पाकिस्तानला देण्यात आले. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स यांच्या संमतीशिवाय हा निर्णय होऊ शकत नव्हता. या देशांनी उघडपणे पाकिस्तानची बाजू घेतली असे आता म्हणता येईल. आणि आखाती देशांनी इस्लामच्या नावाखाली पाकिस्तानला मदत केली. सौदी अरेबिया, तुर्की, अजरबेझान, इराण यांच्यासह अनेक देशांनी पैशाचा ओघ पाकिस्तानकडे वळविला. पाकिस्तानने भारताशी संघर्ष करण्याचे साहस केले तेच मुळी या देशांच्या भरवशावर. चीनची शस्त्रे आणि आखाती देशांकडून मिळणारा पैसा या दोन आधारांवर पाकिस्तान या संघर्षात टिकाव धरू शकला. आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने पाकिस्तानला मोठी आर्थिक मदत केली. विशेष म्हणजे भारत-पाकिस्तान चकमक सुरू असताना केली. हा निर्णय स्थगित ठेवता आला असता. पण, मुद्रा निधीला पाकिस्तानला मदत करण्याची घाई झाल्याचे दिसत होते. अमेरिकेच्या पाठिंब्याशिवाय हे होऊ शकत नव्हते.

**प्रश्न एस- ४०० चा :** भारताने काही वर्षांपूर्वी रशियाकडून एस- ४०० ही हवाई संरक्षण प्रणाली विकत घेतली होती. या प्रणालीचा फार मोठा फायदा नुकत्याच झालेल्या भारत-पाक चकमकीत भारताला झाला. पण, यावरही अमेरिकेने आक्षेप घेतला होता. भारतावर आर्थिक निर्बंध लावण्याची धमकी दिली होती. प्रत्यक्षात अमेरिकेने काही केले नव्हते. आता पाकिस्तानला पाठिंबा देऊन त्याचाच बदला अमेरिका घेत आहे असे म्हणता येईल. अमेरिका काहीही म्हणत असली तरी एस-४०० संरक्षण प्रणाली भारतासाठी किती उपयोगाची आहे हे या चकमकीत दिसून आले. रशियाने भारताला स्वस्त कच्चे तेल पुरविले आणि चांगली संरक्षण प्रणाली पुरविली. पण, अमेरिका, युरोप व आखाती देश यांना भारताचा हा निर्णय स्वीकारता आला नाही असे आता दिसते. त्यांना भारताला उघड विरोध न करता, पाठिंबा दिला तो मात्र पाकिस्तानला.

**पाकचा निषेध नाही :** जगातील अनेक देश दहशतवादाला आमचा विरोध असल्याचे सांगत भारताला पाठिंबा देत आहेत. पण, दहशतवादाची जननी मानल्या जाणाऱ्या पाकिस्तानच्या विरोधात बोलण्याचे साहस कुणी केल्याचे ऐकीवात नाही. मग, या देशांच्या दहशतवादविरोधी भूमिकेचा काय अर्थ काढावयाचा?

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# पवित्र दानातून जोडूया 'रक्ता'चे नाते!

एरवी आपण पाण्याला जीवन म्हणतो. हे खरेही आहे. मात्र, आणखीही एक द्रव असा आहे जो मानवी जीवनासाठी अत्यावश्यक आहे आणि तो म्हणजे रक्त. नुकताच रक्तदान दिवस १४ जूनला साजरा करण्यात आला. या निमित्ताने अनेक ठिकाणी अनेकांनी आयोजित शिबिरांमध्ये रक्तदान केले. आपल्याकडे रक्तदान हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, जोवर आपल्याला त्याची किंमत कळत नाही तोवर रक्तदानाचे महत्त्वही जाणवत नाही. आपल्याकडे स्वातंत्र्यदिन, गणराज्यदिन किंवा राजकीय नेत्यांचे वाढदिवस अशा निमित्ताने रक्तदान होते. पण सणावारांचे दिवस, उन्हाळा आणि परीक्षेच्या कालावधीत रक्तदान शिबिरांचे प्रमाण अत्यल्प असते. त्यामुळे एकूणच स्थिती पाहता आपल्याकडे रक्ताचा तुटवडा जाणवतो. हे प्रमाण थोडेथोडके नसून फार मोठे आहे. तज्ज्ञांच्या मते, दरवर्षी देशात १.२ कोटी युनिट रक्ताची गरज असते. पण केवळ ९० लाख युनिट रक्त संकलित होते. त्यामुळे ३० लाख युनिटचा तुटवडा कायम राहतो. याचा परिणाम म्हणून की काय, रुग्णांना पैसे घेऊन रक्तदान करणाऱ्या व्यावसायिक रक्तदात्यांवर अवलंबून राहावे लागते. आजही ५० टक्क्यांपेक्षा कमी रक्तदान खऱ्या अर्थाने स्वयंस्फूर्त आहे. उरलेले रक्तदान हे व्यावसायिक किंवा नातेवाईकांमार्फत होते.



मुळात, रक्तदानाची गरज इतकी मोठी आहे की, ते स्वयंप्रेरणेने व्हायला हवे. त्यातही तरुण वर्गाने यात पुढाकार घेण्याची गरज आहे. चाळिशीनंतर विविध आजारांचा विळखा असल्याने बरेच लोक इच्छा असूनही रक्तदान करू शकत नाही. म्हणूनच तरुण वयात रक्तदानाविषयी जागरूकता हवी आणि रक्तदानाचे प्रमाणही त्यायोगेच वाढणार आहे. रक्तदानाच्या कमी प्रमाणामागे यासंदर्भातील अनेक गैरसमजही कारणीभूत आहेत. आजही अनेकांना असं वाटतं की, रक्तदान केल्याने शरीरातील रक्त संपतं, हा गैरसमज आहे. प्रौढ शरीरात सरासरी ५ लिटर रक्त असतं. रक्तदान करताना ४५० मिली रक्त आपल्या शरीरातून बाहेर काढलं जातं. निरोगी व्यक्तीच्या शरीरात तेवढं रक्त २४ ते ४८ तासांत पुन्हा तयार होतं. रक्तदान केल्याने शरीर कमकुवत होतं, असंही अनेकांना वाटतं. पण हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. कारण रक्तदान केल्याने शरीरात नवीन रक्त आणि रक्तपेशी तयार होण्याची प्रक्रिया जलदगतीने होते. रक्तदानामुळे झालेली रक्ताची हानी शरीर काही दिवसांत भरून काढतं. रक्तदानासाठी रक्त घेताना डिस्पोजेबल निडल्स वापरल्या जातात. तसेच घेतलेल्या रक्ताच्या वेगवेगळ्या चाचण्या करून रक्त सुरक्षित असल्याची खात्री केली जाते. त्यामुळे रक्तदान केल्याने आजारांचा संसर्ग होत नाही. असे म्हटले जाते की, जर तुमच्या शरीरात लोहाचे प्रमाण जास्त असेल तर हृदयविकाराचा धोका वाढतो. रक्तदान केल्याने तुमच्या शरीरात लोह संतुलित राहते. अशा प्रकारे, हृदय सर्व रोगांच्या जोखमीपासून संरक्षित ठेवता येते. रक्त शुद्धीकरणामुळे कर्करोगाचा धोकाही कमी होतो. लठ्ठपणा हे सर्व रोगांचे मूळ आहे असे म्हणतात. परंतु तुम्ही वेळोवेळी रक्तदान करत राहिल्यास, व्यायामासोबतच सकस आहार घेतल्यास तुमच्या कॅलरीज जलद बर्न होतात आणि वजन नियंत्रणात राहतं. रक्तदान करण्यापूर्वी तुमच्या शरीराच्या आवश्यक चाचण्या केल्या जातात. हे तुम्हाला तुमच्या शरीराची खरी स्थिती कळू देते. तुमचे अहवाल योग्य असतील तेव्हाच तुम्ही रक्तदानासाठी पात्र समजले जातात. त्यानंतरच तुमचे रक्त घेतले जाईल. अशा परिस्थितीत रक्तदान करण्यापूर्वी केलेल्या आरोग्य तपासणीतून तुम्हाला तुमच्या आरोग्याविषयी माहिती मिळते. या सर्व बाबींचा विचार करता रक्तदान हे केवळ एखाद्याचे प्रमाण वाचविण्याचे माध्यम नाही तर स्वत:ला निरोगी ठेवण्यासाठी किंवा निदान आपल्या आरोग्याविषयी माहिती जाणून घेण्यासाठी तरी प्रभावी आहे, हे मान्य केलेच पाहिजे. आता राज्यात रक्ताविषयी 'नो शॉर्टेज, नो वेस्टेज' धोरण लागू झाले आहे. यामुळे रक्तदानाविषयी जागरूकता वाढणे आणि साठवलेले रक्त गरजूंच्या कामी यावे यासाठी योग्य ते नियोजन करण्याचीही पावले उचलली जाणार आहेत. जोवर आपल्याला रक्ताची गरज पडत नाही तोवर आपल्याला त्याची किंमत कळत नाही. मात्र, अशी वेळच येऊ नये यासाठी विशेषत: तरुण वर्गाने आणि निरोगी व्यक्तीने स्वेच्छेने रक्तदान करणे ही काळाची गरज आहे. अनेक जण स्वत:च्या वाढदिवसाला रक्तदान करतात. अशांनी इतरांनाही रक्तदानासाठी प्रेरित करावे आणि या माध्यमातून आपण फार मोठे सामाजिक कार्यच नव्हे तर जीव वाचविण्याचे पुण्यकर्मच करणार आहोत, याची जाणीव असू द्यावी. समाजातील गरजू रुग्णांसोबत आपले रक्ताचे नाते निर्माण करण्यासाठी सर्वांनी रक्तदानासाठी पुढाकार घ्यावा.

७७५५९३८८२२

## कानोसा

अमोल पुसदकर

# वीरांगनेचे कृतज्ञ स्मरण

मणिकर्णिका मोरोपंत तांबे यांची कन्या आईच्या अकाली निधनाने पोरकी झाली. वडील मोरोपंत तांबे हे आपल्या लहानशा मुलीला घेऊन उत्तर प्रदेशातील बिठूर येथे पेशव्यांच्या दरबारी आले. त्यावेळेला तिथे पेशवे बाजीराव द्वितीय हे राज्य करीत होते. त्यावेळेस संपूर्ण भारतावर इंग्रजांचा अंमल झालेला असल्यामुळे पेशव्यांचे राज्य हे नामधारीच होते. बाजीराव द्वितीय यांना मुलगा नसल्यामुळे त्यांनी नानासाहेब पेशवे यांना दत्तक घेतलेले होते. नानासाहेब हे राज्याचे उत्तराधिकारी असल्याने एका राजपुत्राप्रमाणेच त्यांचा शस्त्रविद्या शिकण्याचा अभ्यास सुरू होता. मणिकर्णिका ही नानासाहेबांच्या समवयस्क होती. ती नानासाहेबांना घोड्यावर बसणे, शस्त्रविद्या शिकणे इत्यादी गोष्टी करताना बघत होती. लहानपणापासून तिला या सर्व गोष्टींची आवड होती. त्यामुळे तिच्या वडिलांनी सुद्धा तिच्या आवडीप्रमाणे तिला घोडेस्वारी, तलवारबाजी, मल्लखांब व्यायाम या सर्व गोष्टींची शिकवण दिली. त्या काळामध्ये मुलींच्या शाळा नव्हत्या तरी मुलींना घरी शिकवण्याची व्यवस्था केली जायची. मोरोपंत हे पेशव्यांचे कारभारी होते. त्यामुळे मणिकर्णिकेची शिकवणी सुरू होती. एकदा तिला शिक्षकांनी एक वाक्य लिहायला सांगितले. ते होते ''मैं बहादूर बनूंगी.'' मणिकर्णिकेने लिहिले ''मैं बहादूर हूँ.'' मुलांचे पाय पाळण्यात दिसतात अशा पद्धतीची एक म्हण आहे. ज्यांनी मणिकर्णिकेचे बालपण बघितले त्यांना कल्पना यायला लागली की ही सर्वसामान्य मुलगी नाही. संपूर्ण देशात चाललेला इंग्रजांचा अत्याचार, दडपशाही या सर्व गोष्टी तिच्याही कानावर येत होत्या. त्यामुळेच इंग्रजांबद्दल एक प्रतिकूल भावना तिच्या मनामध्ये निर्माण होत गेली.

त्या काळात कमी वयामध्येच मुलींचे लग्न केले जायचे. मणिकर्णिकेचे लग्न झाशीचे महाराज गंगाधरराव यांच्याशी झाले. मणिकर्णिका बिठूरवरून आता झाशी येथे आलेली होती व तिचे नवीन नाव होते झाशीची राणी 'लक्ष्मीबाई.'

झाशी येथे आल्यावर सुद्धा लक्ष्मीबाईने आपला शस्त्रविद्या अभ्यास सुरूच ठेवला. देशाची परिस्थिती पाहता महिलांनाही शस्त्र हातात घ्यावे लागू शकते कदाचित ही दूरदृष्टी त्यांची होती. त्यामुळेच त्यांनी महिलांना एकत्र करून शस्त्र शिक्षण देणे सुरू केले. तो काळ असा होता की ज्या काळामध्ये महिला घराच्या बाहेर निघत नव्हत्या तसेच उत्तर प्रदेशासारख्या राज्यामध्ये तर घुंगट प्रथा सुद्धा होती. परंतु अशा काळामध्ये त्यांनी महिलांशी संपर्क करणे व त्यांना शस्त्रविद्या शिकायला तयार करणे, घोडेस्वारी, तलवारबाजी शिकवणे, एवढेच काय तर तोफांमध्ये गोळे भरून ते उडवायला सुद्धा शिकविले.



राणी लक्ष्मीबाई यांना पहिला मुलगा झाला परंतु तो अल्पायुषी ठरला व त्यानंतर लवकरच राजेसाहेब गंगाधरराव यांचे सुद्धा निधन झाले. त्यावेळेस त्यांनी दामोदरराव नावाच्या मुलाला दत्तक घेतले व त्याला झाशीचा उत्तराधिकारी घोषित केले. परंतु त्या काळामध्ये इंग्रज सरकार ज्या ज्या राज्यांना वारसदार नाही अशा राज्यांना खालसा करण्याचे धोरण अवलंबीत होते. त्याचाच वापर करून इंग्रजांनी झाशीचे संस्थान सुद्धा खालसा केले. इंग्रजांची ही बदमाशी झाशीच्या तेजस्वी राणीला खपली नाही. तिने गर्जना केली ''मेरी झाशी नहीं दूंगी.'' परंतु या गर्जनेचा अर्थ युद्धामध्ये परिवर्तित होणार होता. हे तिला चांगले माहिती होते. सर ह्यू रोज नावाच्या इंग्रज सेनापतीने झाशीच्या किल्ल्याला वेढा दिला. झाशीच्या राणीने जेवढी शक्य आहे तेवढी युद्धाची तयारी करून ठेवलेली होती. इंग्रजांच्या सैन्याने झाशीला वेढा दिल्यानंतर झाशीच्या राणीने अतुलनीय पराक्रम गाजविला. झाशीच्या तोफांनी इंग्रजांच्या तोफांना सडेतोड उत्तर दिले. पुरुषांची सेनाच काय परंतु राणीच्या नेतृत्वात महिलांची सेना सुद्धा इंग्रजांशी लढली. झाशीच्या राणीला प्रत्यक्ष पुरुषी वेशामध्ये घोड्यावर बसून इंग्रजांशी युद्ध करताना सर ह्यू रोज याने बघितले होते. त्याने झाशीच्या राणीचे वर्णन करताना एक अतुलनीय सेनापती व पराक्रमी योद्धा असे वर्णन केलेले आहे. परंतु इंग्रजांचा हा वेढा झाशीच्या किल्ल्याच्या भोवती अधिकच बळकट होत गेला. त्यामुळे शेवटी लक्ष्मीबाईने आपला मुलगा दामोदरराव याला घेऊन इंग्रजांचा वेढा फोडून ती काल्पीकडे निघाली. तिच्यासोबत अगदी मोजके सैन्य होते. ती काल्पीला पोहोचली हे वृत्त इंग्रजांना समजले. त्यावेळेला इंग्रजांची एक तुकडी काल्पीच्या दिशेने रवाना झाली. इंग्रज येत आहे हे समजल्यावर राणीला थोडीशीही उसंत मिळाली नाही. त्यामुळे तिला ग्वाल्हेरकडे कूच करावे लागले. ग्वाल्हेरला तिची भेट तात्या टोपे यांच्यासोबत झाली. तेथे सुद्धा इंग्रजांनी तात्या टोपे व राणीच्या सैन्याशी लढाई मांडली. सरते शेवटी ग्वाल्हेरजवळ कोटाची सराई येथे इंग्रजांशी तिचे निर्णायक युद्ध झाले. युद्ध करीत असताना ती गंभीररीत्या जखमी झालेली होती. शेवटी आपला अंतकाळ जवळ आला आहे असे पाहून तिने इंग्रजांचा वेढा भेदून निसटून जाण्याचा प्रयत्न केला. ही जीवन मरणाची लढाई होती. हा अखेरचा संघर्ष होता. शेवटपर्यंत तिने आपल्या मुलाला सोडले नाही व त्याला घेऊनच ती इंग्रजांचा वेढा भेदून जंगलाच्या दिशेने निघाली. इंग्रज तिच्या मागावरच होते. काही अंतर कापल्यानंतर झाशीच्या राणीचा घोडा सुद्धा मरण पावला. त्यावेळेला ती खाली पडली. तिच्या सहकाऱ्यांनी तिला उचलले व जवळच असलेल्या बाबा गंगादास यांच्या आश्रमात नेले. राणीचे ते शेवटले क्षण होते. तिने आपल्या सहकाऱ्यांवर पुत्र दामोदरची जबाबदारी दिली. त्याला शिकवा, मोठा करा व देशासाठी लढा द्यायला सांगा हा संदेश तिने आपल्या सहकाऱ्यांना दिला व त्यानंतर ती म्हणाली, माझ्या मृत्यूनंतर माझे शव हे शत्रूच्या हातात सापडू नये यासाठी या आश्रमाला तुम्ही आग लावून द्या.

राणी इथून आपल्या अंतिम प्रवासाला एकटीच जाणार होती. ''वासुदेव तुमे प्रणाम'' योगेश्वर कृष्णाला आपला अंतिम प्रणाम करून १८५७ च्या स्वातंत्र्य समरातील धगधगती ज्वाला शांत झाली. भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी लढता लढता राणीने आपला देह स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात समर्पित केला. ज्या वयामध्ये लोक आपल्या संसाराची सोनेरी स्वप्न पाहतात अशा अगदी तरुण वयामध्ये राणीने देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले बलिदान दिले. झाशीची राणी लक्ष्मीबाईच्या बलिदानाने संपूर्ण भारतातील हजारो लोकांनी प्रेरणा घेतली व इंग्रजांच्या दमनचक्रानंतर सुद्धा स्वातंत्र्यासाठीची लढाई सुरूच ठेवली. झाशीची राणी अनंतात विलीन झाली. परंतु तिच्याबद्दल असे म्हटलेले आहे

''जावो रानी तुम्हे याद करेंगे हम कृतज्ञ भारत वासी
यह तेरा बलिदान दिलायेगा स्वतंत्रता अविनाशी
चूप रहे इतिहास सच्चाई को लगे चाहे फासी
हो मदमाती विजय या फिर गोलोंसे ध्वस्त हो झांसी
तेरा स्मारक तुही होगी, तू खुद अमिट निशानी थी।

झाशीची राणी लक्ष्मीबाई या वीरांगनेचे हे कृतज्ञ स्मरण आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### तरुण भारतचे वेगळेपण आणि श्रेष्ठत्व

नुकतीच तरुण भारतसोबत एक अनमोल भेट मिळाली. त्यांनी संकलित केलेल्या बिया! ही भेट पाहून मनापासून आनंद झाला. तरुण भारतने शताब्दी वर्षानिमित्त हाती घेतलेला हा उपक्रम, अनेक वर्षांपर्यंत तरुण भारतच्या कृतज्ञतेची आठवण करून देणारा आहे. या बियांमधून उगवणारी झाडे शेकडो वर्षे निसर्गात नांदतील आणि प्रत्येक पिढीला या उपक्रमाची प्रेरणा देतील आठवण करून देतील. नुकतीच वटपौर्णिमा झाली. अनेक तथाकथित पुरोगामींनी वटपौर्णिमा ही एक थोतांड आहे, असे म्हणत वादंग माजवले. काहींनी सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी उथळ आणि उलटसुलट वक्तव्ये केली. मात्र काही सजग नागरिकांनी आणि अभ्यासू व्यक्तींनी यांना सडेतोड उत्तर देत ही कावकाव थांबवली.

तरुण भारतने मात्र कृतीतून संस्कृती आणि निसर्गाचा वसा जपला. वटपौर्णिमेच्या दोन दिवस आधी त्यांनी बहुगुणी, प्राणदायिनी अशा वडाच्या रोपांचे वितरण करून एक सकारात्मक संदेश दिला. नेहमीप्रमाणेच तरुण भारतचे वेगळेपण आणि श्रेष्ठत्व यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. तरुण भारतने आपल्या नावासारखेच तरुण राहून, नवनवीन उपक्रमांच्या माध्यमातून भारताला प्रगतिपथावर नेण्याचे कार्य सुरू ठेवावे, हीच सदिच्छा. शताब्दी वर्षानिमित्त तरुण भारतला शुभेच्छा.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

### दक्षिण आफ्रिकेचा लॉर्ड्सवर ऐतिहासिक विजय

प्रचंड उत्सुकता लागलेल्या जागतिक क्रिकेट कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत द.आफ्रिका संघाने बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाला खडे चारत पहिल्यांदाच विजेतेपद पटकावले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत एडन मार्करम आणि टेंबा बवुमाने कांगारूंचा प्रतिकार करत लॉर्ड्सवर विजयाचा टेंभा मिरवला आहे. आयसीसी स्पर्धेत सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या द. आफ्रिकेला यश वारंवार हुलकावणी देत होते. मात्र यावेळी त्यांचे नशीब फळफळले आणि तब्बल २७ वर्षानंतर त्यांचा आयसीसी चषकाचा दुष्काळ संपुष्टात आला आहे.

टेंबा बवुमाच्या नेतृत्वात या संघाने इतिहास रचत चोकर्सचा डाग पुसून काढला आहे. चौथ्या डावात यशस्वी पाठलाग करताना त्यांनी स्टार्क, हेझलवूड आणि पॅट कमिन्सला भीक न घालता पक्का निर्धार करत अजिंक्यपद प्राप्त केले आहे. टी-२० विश्वचषक, चॅम्पियन ट्रॉफी पाठोपाठ कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत कांगारूंचे गर्वहरण झाले असून द. आफ्रिका नवा विजेता म्हणून उदयास आला आहे. १९९८ ला बांगलादेशात झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीच्या विजयानंतर या संघाला आयसीसी चषकासाठी जीवघेणी प्रतीक्षा करावी लागली. टेंबा बवुमाने आपल्या लीलयेने आफ्रिका संघाला 'पंगुं लंघयते गिरिम' करून दाखवले आहे.

**डॉ. अनिल पावशेकर**/९८२२९३९२८७

### अल्पवयीन मुलाच्या हातात अपघाताची चावी?

सध्या देशभरात अपघातांचे प्रमाण वाढले असून, त्यामध्ये अल्पवयीन मुलांकडून चालवलेल्या वाहनांची भूमिका अधिकच चिंताजनक ठरत आहे. नुकत्याच घडलेल्या एका अपघातात १७ वर्षीय मुलाच्या गाडी चालवण्यामुळे दोन निष्पाप जीवांचे बळी गेले. यानंतर पुन्हा एकदा समाज, पालक, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेच्या जबाबदारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आजच्या काळात अल्पवयीन मुलांना गाडी चालवण्याचा मोह होतो, हे खरे; पण त्याहून मोठी जबाबदारी पालकांची आणि समाजाची आहे. परवाना नसताना दुचाकी किंवा कार देणारे आई-वडील नकळतपणे त्यांच्या मुलाच्या हातात अपघाताची चावी देत आहेत. शिक्षणाच्या, खेळाच्या वयात वेगाच्या झिंगेत वाहन हाताळणं, हे केवळ कायद्याचे उल्लंघन नाही, तर भविष्यातील आयुष्य उद्ध्वस्त होण्याचे बीज ठरते. वाहन देणारे पालक दोषी आहेत, पण यंत्रणाही तितकीच अपुरी आहे. ट्रॅफिक पोलिसांनी फक्त हेल्मेट वा सीटबेल्ट तपासून थांबू नये, तर वाहन चालवणाऱ्याचे वय, परवाना आणि ओळखपत्र तपासणंही बंधनकारक व्हायला हवं. शाळा, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांचं प्रशिक्षण देणं सुरू करावं. सोशल मीडियावर 'वेग' हा शौर्याचा मापदंड ठरतो, तो पिढीच्या मानसिकतेवर प्रभाव टाकतो. या प्रवृत्तीला रोखण्यासाठी जनजागृती मोहिमा आणि कठोर शिक्षा दोन्ही आवश्यक आहेत. न्यायालयांनी नुकत्याच एका प्रकरणात अल्पवयीन मुलाला गाडी देणाऱ्या पालकाला दोषी धरले. ही बाब आदर्श ठरावी अशी अपेक्षा आहे. 'मुलं शिकताहेत' म्हणून त्यांची चूक दुर्लक्षित करणे हे त्यांच्या आयुष्याशी खेळण्यासारखं आहे. वाहन सोय आहे, खेळणं नाही. नियम हे सुरक्षिततेसाठी आहेत, बंदी घालण्यासाठी नाहीत. म्हणूनच, 'माझं बाळ गाडी चालवतो' या अभिमानाचं रूपांतर 'माझ्या बाळामुळे कुणाचा प्राण गेला' अशा पश्चात्तापात होण्याआधीच पालकांनी जागं व्हावं.

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# देशभक्तीचा जागर! 'बालाघाट प्रतिष्ठान'तर्फे जागतिक रक्तदान दिन व कै. कॅप्टन राजपालसिंह हजारी भैय्या पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर व आजी-माजी सैनिकांचा सत्कार सोहळा!

**१३६ रक्तदात्यांनी केले महादान; शहिदांना श्रद्धांजली अर्पण!**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१६ जून**

जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून आणि कै. कॅप्टन राजपालसिंह हजारी भैय्या यां... च्या पुण्यतिथीनिमित्त, बालाघाट प्र... वतीने आज भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. याप्रसंगी देशसेवेतील योगदानाबद्दल आजी-माजी सैनिकांचा सन्मान सोहळाही मोठ्या उत्साहात पार पडला. या पवित्र दिवशी देशभरातील शहिदांना, विशेषतः पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यातील २६ निष्पाप बळींना आणि अहमदाबाद येथील विमान अपघातात दुर्दैवी मृत्यूमुखी पडलेल्या २४२ लोकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

अभूतपूर्व उत्साह आणि रक्तदानाचा महायज्ञ!

आजच्या शिबिरात १३६ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून आपले सामाजिक कर्तव्य बजावले. रक्तदात्यांच्या या प्रतिसादाने 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

डॉ. स्वरूपसिंह हजारी प्रेरणादायी मार्गदर्शन

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बालाघाट प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि नगर अध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी साहेब यांनी प्रतिष्ठानच्या विविध कार्यांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' या विशेष उपक्रमाबद्दलही माहिती दिली. आजी-माजी सैनिकांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे, असे सांगत त्यांनी देशसेवकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या पूज्य वडील कै. कॅप्टन राजपालसिंह हजारी भैय्या यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त यापूर्वी आयोजित रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्य वाटप, दिव्यांग बांधवांना सायकल वाटप, आणि कोरोना काळात किट वाटप यांसारख्या विविध सामाजिक कार्यक्रमांची माहिती दिली. यापुढेही दरवर्षी असेच नवनवीन उपक्रम राबवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.



आजी-माजी सैनिकांचा तिरंगी फेटा व ट्रॉफी देऊन गौरव

देशासाठी अहोरात्र झटणाऱ्या आजी-माजी सैनिक आणि सीमा सुरक्षा दलाच्या जवानांचा बालाघाट प्रतिष्ठानच्या वतीने तिरंगी फेटा आणि आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. या सन्मानाने उपस्थित सर्व सैनिकांचे मनोधैर्य उंचावले आणि उपस्थितांनाही देशप्रेमाची प्रेरणा मिळाली.

मान्यवरांचे मार्गदर्शन व शुभेच्छा

या प्रसंगी माजी नगर अध्यक्ष शेषरावजी फावडे, पोलीस निरीक्षक श्री. देवीदास वाघमोडे साहेब, वन परिक्षेत्र अधिकारी ईश्वर घुणावत साहेब यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी बालाघाट प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती

या भव्य आणि प्रेरणादायी सोहळ्यास माजी नगर अध्यक्ष लक्ष्मणराव सिरसट, माझी स्वतंत्र सैनिकी चे अध्यक्ष दत्ताभाऊ शिनगारे, माजी नगर अध्यक्ष उत्तमलाल तोष्णीवाल, हनुमंत बप्पा नागरगोजे, सभापती महादेवराव तोडे, उपसभापती सुनीलराव शिनगारे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष नितीन भैया शिनगारे, ज्येष्ठ प्रमोद काका तिवारी, उपनगर अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, माजी नगरसेवक यशवंतराव गायके, यूथ क्लब अध्यक्ष दत्तात्रेय गोरे, बाबूभाई मिस्त्री, वाईस ऑफ मीडियाचे अध्यक्ष अतुल भैया शिनगारे, युवा पत्रकार संघ अध्यक्ष नाथाभाऊ ढगे, काँग्रेस तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर रदवे सर, नगरसेवक राजू शेठ कोमटवार, कृष्णा शेठ भावठाणकर, आरपीआय तालुका अध्यक्ष धोंडीराम सिरसट, पहाडी राजे बाळासाहेब चव्हाण, गटनेते रोहित हजारी, नगरसेवक बालाजी चव्हाण, बाळासाहेब खामकर, रूपेश चिद्रवार, संतोष बप्पा सिरसट, युवा नेते माणिकराव लोखंडे, नगरसेवक सुरेश लोकरे, माजी तालुका अध्यक्ष ॲड. बाळासाहेब चोले, शहर अध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष गणेश बडे, भाजप युवा मोर्चा शहर अध्यक्ष ॲड. मोहन भोसले, युवा नेते नदीम मोमिन, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, युवा नेते रामप्रभू मुंडे, अजयसिंह हजारी, तुकाराम महाराज तिडके, ॲड. नवनाथ पांचाल, अंगद मुंडे, ॲड. साजेद भाई, सर्व पत्रकार बांधव, व्यापारी बांधव, नगरसेवक, आजी-माजी सैनिक, वकील बांधव आणि परिसरातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम

या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपक पटवर्धन, सचिन दुबे, संतोषसिंह पवार, एजाज भाई, रूपेश चिद्रवार, ॲड. मोहन भोसले आणि रविशंकर कुंभार यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. मोहन भोसले यांनी केले.

या सोहळ्याने बालाघाट परिसरात देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा नवा आदर्श घालून दिला.

# बीडमध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात; धारूर तालुक्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सहभाग, पटनोंदणी वाढीवर भर

## तहसीलदार, नायब तहसीलदार, गटविकास अधिकाऱ्यांनी दिल्या शाळांना भेटी

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१६ जून**

संपूर्ण महाराष्ट्रात नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रारंभ सोमवार, १६ जून रोजी मोठ्या उत्साहात झाला. बीड जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पहिल्याच दिवशी चैतन्यमय वातावरण पाहायला मिळाले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निर्देशानुसार, '१०० शाळांना भेटी देणे' या विशेष उपक्रमांतर्गत लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी, तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत केले.



या उपक्रमांतर्गत, धारूर तालुक्यातही अधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत विविध शाळांना भेटी दिल्या. तहसीलदार श्री. निळे एस.आर. यांनी जि.प.प्रा.शा. वडारवाडी येथे भेट दिली, तर नायब तहसीलदार श्री. पाळवदे एस.बी. यांनी जि.प.प्रा.शा. कसबा धारूर येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. गटविकास अधिकारी श्री. लोखंडे वैजनाथ यांनी जि.प.प्रा.शा. शिक्षक कॉलनी येथे उपस्थिती लावली, तर सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. कांदे एस.एम. यांनी जि.प.प्रा.शा. गोपाळपूर येथे भेट दिली. तसेच, गटशिक्षणाधिकारी श्री. गिरी यांनी जि.प.प्रा.शा. चोरांबा येथील कार्यक्रमात सहभाग घेतला.

भेटीचा मुख्य उद्देश:

या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ विद्यार्थ्यांचे स्वागत करणे इतकाच नव्हता, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटनोंदणीत लक्षणीय वाढ करणे हाही होता. विशेषतः इयत्ता पहिलीमध्ये १०० टक्के विद्यार्थी दाखल व्हावेत यासाठी अधिकाऱ्यांनी अंगणवाडी ताई आणि पालकांशी संवाद साधून जिल्हा परिषद शाळांमधील सोयीसुविधा, शिष्यवृत्ती आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा पट वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

अधिकारी व लोकप्रतिनिधींकडून मार्गदर्शन:

शाळा भेटीदरम्यान, मा. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच आणि नागरिकांशी संवाद साधला. शाळांची स्वच्छता, वर्गखोल्यांची उपलब्धता, शैक्षणिक गुणवत्ता, निपुण महाराष्ट्र अभियान तसेच शालेय क्रीडा साहित्य व पोषण शक्ती निर्माण योजना यावरही चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांचा पहिला दिवस उत्सवाप्रमाणे साजरा व्हावा यासाठी 'तिथी भोजन'चे आयोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

या उपक्रमामुळे शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिनांक १७ जून रोजी सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी भेटींचा अहवाल जिल्हा कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# पोलिस बांधवांसाठी झालेल्या महाआरोग्य शिबिरात २४० जणांची आरोग्य तपासणी

## रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व इंडीयन मेडिकल असोसिएशन चा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१६ जून**

समाजाच्या रक्षणासाठी सदैव सेवेत तत्पर असणाऱ्या पोलिस बांधवांसाठी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व इंडीयन मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिरात पोलिस बांधव व त्यांच्या कुटुंबियांची तपासणी करण्यात आली.

रविवारी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, इंडीयन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे यांची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना मुरलीधर खोकले म्हणाले की रोटरी व इंडियन मेडिकल असोसिएशन यांनी पोलिस बांधव व त्यांच्या कुटुंबियांना खऱ्या अर्थाने न्याय दिला.ताण,तणाव व कामाचा व्याप यामुळे पोलिसांच्या आरोग्यावर ताण येतो. यासाठी त्यांनीं वर्षातून एकदा आरोग्य तपासणी केली पाहिजे.असे सांगून रोटरी क्लब ने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.यावेळी पोलिस निरीक्षक शरद जोगदंड,रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.नवनाथ घुगे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात या महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्या मागची भूमिका मांडली. व पोलिसांनी या धावपळीच्या युगात कामाचा ताण न घेता आरोग्याची काळजी कशी घ्यावी याचा मौलिक सल्ला दिला.

कार्यक्रमाचे संचलन धनराज सोळंकी यांनी केले.यावेळी रोटरी क्लबचे अंगद कराड, मंजुषा जोशी,स्वप्नील परदेशी, संतोष मोहिते, आनंद कर्णावट,,बाळासाहेब कदम गोपाळ पारीख,प्रदीप झरकर ,डॉ. अनिल केंद्रे, भीमसेन लोमटे,रुपेश रामावत,प्रा.अजय पाठक,सचिन बेंबडे,बालाजी घाडगे,गणेश राऊत,भीमाशंकर शिंदे,रमेश देशमुख,संजय गौड,रुपेश चव्हाण,संजय देशमुख,जतिन कर्णावट,यांची उपस्थिती होती.

या डॉक्टरांचा होता सहभाग

आज झालेल्या महाआरोग्य शिबिरात डॉ.नवनाथ घुगे,डॉ.राहुल धाकडे,डॉ.अतुल शिंदे,डॉ.संजय शेटे,डॉ.अनिल मस्के,डॉ.अरुणा केंद्रे,डॉ.अनिल भुतडा, डॉ.मनिषा भुतडा,डॉ.स्नेहल होळंबे,डॉ.चेतन आदमाने,डॉ.सचिन पोतदार,डॉ.उद्धव शिंदे, डॉ.जबेर शेख,डॉ.विजय लाड,डॉ.निलेश तोष्णिवाल,डॉ.विनोद जोशी,डॉ.योगेश मुळे,डॉ.संदीप चव्हाण,डॉ.शाहिद शेख,डॉ.ऋषिकेश घुले,डॉ.प्रियंका आरबडवाड या डॉक्टरांनी तपासण्या व औषधोपचार केले.

या झाल्या तपासण्या

हृदयरोग,मधुमेह, छातीविकार व दमा, अस्थिरोग,बालरोग,नेत्र तपासणी,स्त्रीरोग, दंत चिकित्सा, त्वचारोग,यासह इसीजी, रक्ताच्या विविध प्रकारच्या तपासण्याही करण्यात आल्या.

# विद्युत सुरक्षा करी जीवन रक्षा !!

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ जून**

आपणास माहीतच आहे वीज दिसत नाही. पाणी हे विजेचे चांगले वाहक असल्याने विजेपासून प्रामुख्याने पावसाळ्यात अधिक सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. त्यामुळे जीवित व वित्त हानीचा धोका निर्माण होतो. विद्युत सुरक्षेबाबत खालील खबरदारी घेतल्यास विद्युत अपघात टाळता येऊ शकतात.

घरात घ्यावयाची खबरदारी

इलेक्ट्रिकल स्वाकेट मध्ये धातूच्या वस्तु घालू नये.

ओल्या हातांनी किंवा पायांनी विद्युत उपकरण हाताळू नये.

योग्य जोडणी नसलेली / तुटलेली वायर किंवा प्लग वापरू नये.

भिजलेल्या भागात विद्युत उपकरणे लावू नयेत, लहान मुलांना विद्युत उपकरणांपासून दूर ठेवावे.

उपकरणाचा वापर झाल्यावर लगेचच प्लग बंद करून पीन काढून ठेवावी.

मोबाइल चार्जिंग सुरू असताना वापर करू नये, एकाच मल्टी पीन स्वाकेट मध्ये अनेक उपकरणे जोडू नये.

स्वतः वायरिंग दुरूस्ती करू नये.

विद्युत सुरक्षा उपकरणे एडउइ / ठउउइ नेहमी कार्यान्वित ठेवावी.

घराबाहेर घ्यावयाची खबरदारी

खेळ वाहिनीच्या तारा, विजेचा पोल, ताण तार या पासून लांब खेळावे.

घराच्या छतावर, गच्चीवर वावरत असताना वीज वाहिनी जवळून गेलेली असल्यास लोखंडी सळी, ओली काठी त्या जवळ नेवू नये.

पाण्यात उभं राहून विद्युत मोटार सुरू करू नये, मोटारच्या वायरला शक्यतो जोड असु नये असल्यास जोडवर योग्य इन्सुलेशन टेपचे आवरण असावे.

शेतातील मोटार व स्टार्टर पेटीला योग्य वायरिंग व सक्षम अर्थिंग असावी.

वीज चोरी करू नये किंवा अनधिकृत जोडणी करू नये.शेत कुंपणात वीज प्रवाह सोडू नये.तुटलेल्या किंवा लोंबकळलेल्या विद्युत तारा, वायर, झुकलेले पोल या पासून लांब रहावे.

वीज वाहिनीच्या तारा खाली थांबू नये, वीज वाहिनी खाली पीक / साहित्य साठवू नये.

असे विद्युत निरीक्षण विभाग, विद्युत निरीक्षक सु. भा. चौधरी यांनी कळविले आहे.

# पेठ बीड पोलीसांची अवैद्य धंद्यावर कार्यवाही

# व्हिडिओ गेम, कमी पैशावर जास्त पैशे गेम खेळविणाऱ्यावर छापा, मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ जून**

आज दि.१६/०६/२०२५ रोजी पेठ बीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, मोमीनपुरा येथे एक ईसम ईलेक्ट्रोनिक साहित्याचा वापर करून व्हिडिओ गेमवर कमी पैशावर जास्त पैशाचे आमीश दाखवून लोकांना व्हिडिओ गेम खेळवित आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाल्यावरून आम्ही सोबत पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व सोबत पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक चालक पोह/१७५८ इम्रान यांनी आमिन मेडिकल मोमीनपुरा च्या बाजूला गेमझ् गोन नावाचा बोर्ड असणा-या गाळयामध्ये छापा टाकला असता वर नमूद वर्णनाचे इलेक्ट्रानिक गेमचे साहित्य व्हिडिओ गेम चालविणारा शेख इम्रान शेख दस्तगीर वय २८ वर्षे रा. मोमीनपुरा हा जागीच मिळून आला व गेम खेळणारे लोक आम्हा पोलीस पार्टीस पाहून पळून गेल्याने पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गु.र.नं. १७१/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदया प्रमाणे गुन्हा नोंद करून आरोपी च्या ताब्यातील व्हिडिओ गेमचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण एकूण ४२,७५०/- रूपायाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक सो नवनीत काँवत साहेब, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो सचिन पांडकर, मा. उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक, चालक पोह/१७५८ इम्रान सर्व नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली

**टी.सी. हरवला आहे**

यश गणेश लोहिया नावाचा १२ वी विज्ञान पासचा टी. सी. सुंदरराव सोळंके महाविद्यालयातून जुन्या मोठ्याकडे जाताना हरवला आहे .कृपया सापडल्या संपर्क साधावा.

संपर्क
९८५०१८९४०१

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई
DNS Bank Ltd. Ambajogai

**ताबा सूचना**

प्रती,

१. मे. श्रध्दा पेट्रोलियम प्रोप्रा. परबत (प्रभाकर) नागोराव काळे (कर्जदार)
पत्ताः-चर्च रोड, उदगीर, ता. उदगीर, जि. लातुर ४१३ ५१७

२. श्री. चौधरी प्रमोद व्यंकटेश
पत्ताः- नोबल कॉलनी, उदगीर, ता. उदगीर, जि. लातुर ४१३ ५१७

३. श्री. बक्ष मो. हालीमुदिन अझीमुदिन अल्लाबक्ष
पत्ताः- उमा चौक, उदगीर, ता. उदगीर, जि. लातुर ४१३ ५१७

विषय :- वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षिततत्तिकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकारी अमलबाजवणी ॲक्ट २००२ (२ रा) च्या सेक्शन १३ (४) नुसार ताबा सुचना

संदर्भ :- बँकेची डिमांड नोटीस क्र. सरफेसी /०८/टीएल-१०, एचवायपी-१२/१२/२०२५-२६ दि.०९.०४.२०२५ अन्वये

महोदय,

उपरोक्त संदर्भीय डिमांड नोटीस दिनांक ०९.०४.२०२५ नुसार मी खालील सही करणार आपणास सुचित करीत आहे की ६० दिवसाची मुदत पुर्ण होवुन व वेळोवेळी आपणास थकीत कर्ज भरण्याची मुदत देवुन सुध्दा थकीत कर्ज रक्कम जमा न केल्यामुळे खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा कलम १३ (४) अंतर्गत ताबा घेण्यात येईल.

करीता आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०२.०७.२०२५ रोजी दुपारी ०१:०० वाजता (१५ दिवसांच्या आत) किंवा त्यानंतर बँकेच्या वेळेनुसार केव्हाही आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी येत आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यास व पंचनामा तसेच इंव्हेन्टरी तयार करतांना सहाकर्य करावे.

तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील कार्यवाही करतांना आपण अथवा इतर कोणीही कुठल्याही प्रकारचा कार्यवाही मध्ये अडथळे निर्माण केल्यास अथवा कार्यवाही थांबविण्याचा प्रयत्न केल्यास सदर्दू वर्तन हे फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. कृपया नोंद घ्यावी.

परीशिष्ठ :- मालमत्तेचे वर्णन

(मालमत्ता धारकाचे नावः परबत (प्रभाकर) नागोराव काळे)

मे. श्रध्दा पेट्रोलियम, प्रोप्रा. परबत (प्रभाकर) नागोराव काळे यांच्या कर्जप्रकरणात मौजे उदगीर न.प. येथील मालमत्ता एम.सी.नं.२-२-३३२ (जुना), २-२-३६८ (नवीन), पुर्व-पश्चिम ३०, उत्तर-दक्षिण ६० एकुण १८०० चौ. फुट व त्यावरील सर्व बांधकामासह त्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे

पूर्वः- एम. सी. रोड
पश्चिमः- स्मशानभुमी
दक्षिणः- लक्ष्मण आगळे यांचे घर
उत्तरः जब्बार खान पठान यांचे घर
(वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत)

**अधिकृत अधिकारी**

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आई रेणुकेच्या आई रेणुकेच्या आशिर्वादाने माहूरगडावरुन स्वच्छतेची ऊर्जा घेऊन कामाला लागते : मेघना बोर्डीकर

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.१६ जून -**

महिला आणि बालविकास तथा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर ह्या सोमवार दि.१६ जून रोजी माहूर दौऱ्यावर आल्या होत्या.राज्य शासनाचे स्वच्छतादूत द. भ. प. साईनाथ महाराज वसमतकर यांच्या आनंदधाम मठाला भेट देऊन केलेल्या मार्गदर्शनात माहूरगडावरून स्वच्छतेची ऊर्जा घेऊन कामाला लागते, असे प्रतिपादन केले.प्रथम त्यांनी श्री रेणुकामाता मंदिरात जाऊन 'श्री' ची विधिवत पूजा अर्चा केली.या पूजाविधीचे पौरोहित्य रवी काण्णव, संजय काण्णव व शुभम भोपी यांनी केली. मातेच्या दर्शनानंतर संस्थान कार्यालयात कोषाध्यक्ष तथा तहसीलदार मुगाजी काकडे, विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय काण्णव यांनी शाल, श्रीफळ व मातेची प्रतिमा देऊन त्यांचा



सत्कार केला.गडाच्या पायथ्याशी श्री रेणुका माऊली व्यापारी असोसिएशनच्या वतीने शिवसेनेचे शहरप्रमुख विकास कपाटे, राजु सौंदलकर अन्य व्यापाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला.त्यानंतर ना. मेघना बोर्डीकर यांनी श्रीदत्तशिखर संस्थानच्या मंदिरात जाऊन दत्तात्रेय स्वामींचे दर्शन घेतले.

आनंदधाम मठातील कार्यक्रमात पुढे बोलतांना ना. मेघना बोर्डीकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हातात झाडू घेऊन उभ्या देशाला स्वच्छतेचे महत्व पटवून दिले, प्रत्येक घरात शौचालय मंजूर करून मायमाऊलींचा सन्मान जपला,अशी भावना व्यक्त केली. तसेच पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने मागील ११ वर्षात राबविलेल्या विविध जनप्रिय योजनेची त्यांनी मुद्देनिहाय माहिती दिली.

स्वच्छतादूत साईनाथ महाराज यांचे कार्य राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे सारखे अजरामर राहील,असे गौरोद्गगार त्यांनी काढले. यावेळी स्वच्छतादूत साईनाथ महाराज यांनी स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनता आदी विषयावर मार्गदर्शन करून माहूरगडचे धार्मिक महत्व विशद केले.यावेळी व्यासपीठावर द.भ.प.साईनाथ महाराज,खा. नागेश पाटील, जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे,भाजप महिला मोर्चेच्या जिल्हाध्यक्ष संध्याताई राठोड, तालुकाध्यक्ष निळकंठ मस्के,नगरसेवक सागर महामुने,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष विनायक मुसळे,अनिल वाघमारे,रमेश बद्देवार,महिला मोर्चेच्या शहराध्यक्षा स्वाती आडे आदींची उपस्थिती होती.मठाचे वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने व सांगता आनंदाच्या आरतीने झाली. सूत्रसंचलन एस. एस. पाटील यांनी केले, तर भाऊ पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाला भक्तगणांसह भाजप, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

**नगराध्यक्ष दोसानीकडून सत्कार, शाळेत केले वृक्षारोपण**

महिला आणि बालविकास तथा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर ह्या सोमवार दि.१६ जून रोजी माहूर दौऱ्यावर होत्या. तसेच ना.मेघनाताई बोर्डीकर यांचा माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी देखील गडावर यथोचित सत्कार केला. तर गडावरील देवदर्शन व मठावरील कार्यक्रमानंतर मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा माहूर येथे भेट देऊन परिसरात वृक्षारोपण केले. यावेळेस शाळेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला

## विद्यार्थ्यांनी तात्काळ आधार बायोमेट्रीक अद्ययावत करुन घ्यावे : कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१६ जून -**

राज्य व राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या जेईइ , नीट, एमएचसीईटी, एनडीए तसेच अन्य महत्त्वाच्या शैक्षणिक व प्रवेश परीक्षांमध्ये सहभागासाठी विद्यार्थ्यांना आधार आधारित ओटीपी अथवा प्रमाणीकरण आवश्यक असते. मात्र अनेक विद्यार्थ्यांची आधार माहिती बायोमेट्रीकदृष्ट्या अद्ययावत नसल्यामुळे अशा परीक्षांमध्ये नोंदणी करताना अडचणी येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तात्काळ आधार अद्ययावत करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

दहावी, बारावी पर्यंतच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी आपले आधारकार्ड अद्ययावत करणे ही काळाची गरज आहे. आधार बायोमेट्रीक अपडेट अनिवार्य असल्याने विद्यार्थ्यांनी बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक आहे.

# खड्डे मुक्तीसाठी युवक काँग्रेस रस्त्यावर; बेशरमाचे झाडे लावून लक्षवेधी आंदोलन



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१६ जून -**

दरेगाव ते डोणगाव या रस्त्यावर जागोजागी जीवाघेणे खड्डेपडल्याने लोकप्रतिनधी तसेच संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्ह्याधक्ष बालाजी गाडे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसनी खड्यात बेशरमाची झाडे लावून निषेध नोंदवत याविरोधात एल्गार पुकारला आहे.

२१ किमी अंतराचा टाकळी ते मुदखेड रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने शालेय विद्यार्थी, वृद्ध, महिला, रुग्ण यांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. या मार्गावरील गावातील लोकांना जाण्या येण्यासाठी हाच एकमेव मार्ग आहे. जागोजागी जीवघेणे खड्डे पडल्याने वाहनधारकांना वाहने चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. शालेय विद्यार्थी, रुग्ण यांना वेळेवर पोहोचता येत नसल्याने मोठे नुकसान होत आहे. या बाबत युवक काँग्रेसने अनेक वेळा जनआंदोलन छेडून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. खड्डे बुजविण्याच्या नावाखाली कोट्यवधीची बिले उचलली जात असल्याचा आरोप यावेळी युवक कॉंगेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

दरेगाव रस्त्यावर युवक काँग्रेसने खड्डे मुक्तीसाठी दि. १६ जून रोजी गांधीगिरी मार्गाने बेशरमाची झाडे लावून लक्षवेधी आंदोलन केले आहे. युवा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, अध्यक्ष युवा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील मुंगल यांनी लोकप्रतिनिधी व प्रशासनाचा निषेध नोंदवत लाक्षणिक उपोषण केले आहे. यावेळी श्याम पाटील रोहीपिंपळगावकर, केशव पाटील शिंदे, माणिकराव मुंगल, संभाजी गाडे, अनिल कुऱ्हे, चक्रधर कुऱ्हे, रामदास शिंदे, सटवाजी पांडागळे, बापूजी गाडे, दामोदर गाडे, करण गाडे, भगवान गाडे, अंताजी पाटील, सतीश राहिरे, कृष्णा राहिरे, गणपत शिंदे, शहाजी गाडे, अक्षय गाडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणाचा बाजारीकरण बंद करा: विक्रम नागशेट्टीवार

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि.१६ जून -**

शहरात अनेक नामांकित शाळा असून त्या शाळेमध्ये शासनाच्या नियमाची पायमल्ली करत पालकांकडून प्रवेश शुल्क घेतले जातं आहे.शासन नियमानुसार कलम ४५ अन्वये वय वर्ष ६ ते १४ वर्षाखालील बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण घेणे बंधन कारक आहे.

तसेच बालकांना मोफत सक्तीचे शिक्षणाचा अधिकार - २००९ नुसार बालकांना मोफत शिक्षण देणे हे शासनाने निर्गमित केले आहे परंतु देगलूर शहरातील अनेक शाळेत विध्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्काच्या नावाखाली काही संस्थेनी त्याच्या अतर्गत फीस वसुलीचा व्यवसाय सुरु केला आहे. विद्यार्थीच्या पाल्याकडून किमान ५०००/- ते कमाल १००००/- पर्यंत प्रवेश शुल्क आकारली जात आहे. संविधान कलम-४५ व शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ या कायद्याची पायमल्ली करून प्रवेश फीस च्या नावाखाली पैश्याचा काळाबाजार चालू केला आहे. फक्त एवढच नाही तर शाळेमध्ये परीक्षा फीस च्या नावाखाली पण विद्यार्थ्याची लुट सुरु आहे. ही



बाब गांभीर्याने लक्षात घेऊन विद्यार्थ्याची होणारी लुट थांबवावी व विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

फीस च्या नावाखाली जे दुकानदारी चालवत आहेत अशा शाळेवर कायदेशीर कार्यवाही करावी,अन्यथा संविधान पद्धतीने जनआंदोलन करण्यात येईल असे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे प्रदेश सचिव विक्रम नागशेट्टीवार यांनी गटशिक्षणाधिकारी यांना देऊन कळविले आहे. यावेळी दिगंबर कौरवार, विकास मोरे, अस्लम शेख, गजानन टेकाळे आदी उपस्थित होते. एवढेच नसून शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक नांदेड, मुख्य कार्यकारी अधिकारी नांदेड आदि ना स्पीड पोस्ट द्वारे कळवण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### नरसिंह विद्या मंदिर प्राथमिक शाळा सिडको येथे नवागतांचे पुष्प देऊन स्वागत

**नवीन नांदेड**-जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी ता. मुखेड संचलित शिवाजी हायस्कूल सिडको येथील नरसिंह विद्या मंदिर प्राथमिक शाळा येथे दिनांक १६ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना ए.एकुंडवाड यांनी स्वागत केले. नरसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळा सिडको येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रारंभ निम्मित नवागताचे स्वागत व पाठ्य पुस्तक वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्ष स्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वंदना ए. एकुंडवार, प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती एस.आर.संगेवार या उपस्थित होत्या.तसेच एक पालक पुरुष प्रतिनिधी व पालक महिला प्रतिनिधी यांचा सत्कार अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला.वर्ग पहिली साठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका यांचे हस्ते स्वागत करण्यात आले.नवीन शैक्षणिक वर्ष निमित्ताने शिक्षकांचं स्वागत पण मुख्याध्यापिका श्रीमती वंदना ए. एकुंडवार यांनी केले व विद्यार्थी पालक . व शिक्षक यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### नांदेड येथे शिक्षक समन्वय संघाची सहविचार सभा संपन्न

**मुदखेड** -दिः १५ जून रविवार रोजी रॉयल कॅडमी, राजर्षी शाहू विद्यालय बाजूस वसंतनगर नांदेड येथे शिक्षक समन्वय संघाने दि. १८ जून २०२५




बुधवार पासुन आझाद मैदान मुंबई येथे 'हुंकार-महाएल्गार' आंदोलन पुकारले असुन त्या संदर्भात मैदानावरील संख्या कशी वाढेल याबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी कैलास खानसोळे, संजय घोरबांड, नालंदे बी आर, गोविंद वाघमारे, प्रमोद बेळकोने, दत्ता शिधापूरे, पवार एस एम, शिवाजी बोकारे,देव एस एस,वाठोरे एस एम,केंद्रे ए डी,खान एम ए,अहमद जाकीर एन,कदम एन एम,सुरनर आर जी,कपाळे एम डी,वरवंटे एच बी,पवार एम जे,पवार व्ही पी,मुजावर एस के,देवकते पी एच,झुंबाडे एस बी,फाजगे एस व्ही,चिरवरवार सर,मोरे सर,वाघमारे आर पी,चाभरेकर सर,सूर्यवंशी एस एम,रेड्डी एन व्ही,कोरे एस व्ही,शिंदे जी टी यासह असंख्य शिक्षक उपस्थित शिक्षकांनी आपल्याला हक्काचा दि.१४ ऑक्टोंबर २०२४ च्या शासननिर्णयानुसार वाढीव टप्पा अनुदान मिळायचे असेल तर 'एकट चला हे स्वार्थी धोरण' मोडीत काढून एक संघ राहून शिक्षक समन्वय संघाची ताकद वाढवण्याची गरज आहे यासाठी जास्तीत जास्त संख्येने ना नेता ना पुढारी माझी पगार माझी जबाबदारी समजून आझाद मैदानावर उपस्थित राहणार असे सांगितले आहे.

### कुसुमताई प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत



**नवीन नांदेड** -कुसुमताई प्राथमिक व माध्यमिक विद्यालय सिडको येथे शाळेच्या पहिला दिवसा प्रारंभी विद्यार्थ्यांना संस्थेचे सचिव संभाजी बिरादार व प्राचार्य शेशिकलाताई जाधव यांनी पुष्प देऊन स्वागत केले. तर दुपारच्या सत्रात मुख्याध्यापिका कारामुंगे व शिक्षकांनी मुलांचे स्वागत केले. कुसुमताई प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन करून स्वागत करण्यात आले यावेळी पालकांच्या हास्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले.तर दुपारच्या सत्रात कुसुमताई प्राथमिक शाळेत दि.१६ जुन रोजी सोमवार या दिवशी इ.स.२०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा शाळेच्या पहिला दिवसी शाळेत आलेल्या सर्व मुला मुलींचे व पालकांचे गुलाब पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी कुसुमताई प्राथमिक शाळा सिडकोचे मुख्याध्यापक कारामुंगे यांच्या उपस्थितीत सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचाही सहभाग होता. पहिल्या दिवशी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राथमिकचे शिक्षक व्हि. डी.बिरादार यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन मार्गदर्शन केले. यावेळी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालकांची उपस्थिती होती.

## अपघात रोखण्याच्या उपाययोजना करण्यासाठी
# भगतसिंघ चौकात रास्ता रोको आंदोलन




**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१६ जून -**

शहरातील असर्जन येथील भगतसिंघ चौकात अपघात रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात या मागणीसाठी आज जनता पॅंथरच्या वतीने भगतसिंघ चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

शहरातील असर्जन येथील भगतसिंघ चौकातून विष्णूपुरी, हस्सापूर, असर्जन या मार्गावर वाहने धावतात. हा रस्ता तयार करण्यात आल्यानंतर अपघात रोखण्यासाठी याठिकाणी कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. दररोज या मार्गावर अपघात होत असून, अनेकांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. या चौकात अपघात रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी दि.१७ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आली होती. मागणी करुनही याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने जनता पॅंथरच्या वतीने आज भगतसिंघ चौकात रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक खोळंबली होती. या आंदोलनात जनता पॅंथर प्रमुख आकाश चव्हाण, सुरज खिराडे, नेमीचंद भोकरे, शिवाजी गोडबोले, जयदीप पैठणे, जयकुमार डोईफोडे, नंदू वैद्य, पोलीस पाटील खंडेराव बकाल, दत्ता वैद्य, मारोती जाधव, देवेंद्र पाईकराव, सचिन वाघमारे, सुमनबाई रगडे, रेखाबाई खिराडे, सुशिलाबाई रगडे, शांताबाई रगडे, जिजाबाई पाटील, धुरपतबाई वाघमारे, रुक्मीन सरतापे, मिरा चव्हाण आदीसह अनेकांनी सहभाग नोंदविला.

## बाऱ्हाळी येथे योगशिबिर

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि.१६ जून -**

जागतिक योगदिनाचे औचित्य साधून येथील योग भवनाच्या वर्धापन दिनानिमित्त बा-हाळी येथे दि.१७ ते २० जुन असे चार दिवसिय भव्य योग शिबिराचे पतंजली योग समितीच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सिध्ददयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर,तर उद्घाटक म्हणून डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मूखेडकर,योगशिबिराचे उद्घाटक म्हणून सौ.अंजलीताई राजन देशपांडे (सरपंच),सौ.अपर्णाताई चंद्रशेखर देशमुख तर प्रमूख अतिथी म्हणून माणीकराव देशमुख, विजयाताई देशपांडे, जयप्रकाश देशमुख, मल्हारराव देशपांडे यांच्या सह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या योग शिबिरात रक्तदाब, मधूमेह, थायरॉईड, मायग्रेन, वातरोग, कफ,पित्त, स्त्रियांच्या आजारासह विविध आजारानूसार योग घेण्यात येणार असल्याची माहिती मूख्य प्रशिक्षक तथा हरीद्वार येथील पतंजली विद्यापिठाच्या योगप्रशिक्षक, नँचरो. तज्ञ सौ.संध्याताई मठदेवरु यांनी दिली आहे. या शिबिरात विरभद्र स्वामी, नंदीनीताई चौधरी, मिनाक्षी स्वामी यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे.

## पंचशील शाळा व श्री. दत्त महाविद्यालय जवळ गतिरोधक बसविण्याची गरज



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.१६ जून -**

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून जो- तो विद्यार्थी नवनवीन दप्तर, वह्या , पुस्तक, पेन घेण्यात गुंग असताना त्यांच्या पालकांना मात्र त्यांच्या सुरक्षिततेची चिंता भेडसावत असून हदगाव शहरातील सर्वात मोठ्या शाळांपैकी एक असलेली नांदेड रोड स्थित पंचशील माध्यमिक विद्यालय व तामसा रोड स्थित श्री. दत्त महाविद्यालय या ठिकाणी सद्यस्थितीत रस्ते प्रशस्त व चकाचक झाल्याकारणाने इथून वाहनांची मोठी प्रमाणावर वर्दळ वाढल्याने या ठिकाणी गतिरोधक बसविण्याची नितांत गरज असल्याचे पालक वर्गातून बोलले जात असून भविष्यात एखादी अप्रिय घटना घडण्यापूर्वीच संबंधित कंपनीने या ठिकाणी त्वरित गतिरोधक बसविण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे बनले असून भविष्यात जीवित हानी व वित्तीय हानी झाल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी या कंपनीवर राहील असे सुद्धा यानिमित्ताने पालक वर्गातून बोलले जात आहे.

हदगाव शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग जोडल्या कारणाने शहरातील रस्ते हे काही वर्षांपूर्वी प्रशस्त चकाचक व गुळगुळीत झाल्या कारणाने वाहनधारक यांच्या वेगावर कोणताच अंकुश राहत नाही त्यातच पंचशील शाळेकडे मार्गस्थ झालेल्या विद्यार्थ्यांना गावातून शाळेकडे जातांनी रस्ता ओलांडूनच शाळेत प्रवेश घ्यावे लागत असतो म्हणून या ठिकाणी गतिरोधक बसविण्याची नितांत गरज आहे शिवाय विद्यार्थ्यांची सुरक्षेतेचा प्रश्न सुद्धा निकाली निघेल. दुसरीकडे तामसा रोड ही प्रशस्त झाल्याकारणाने श्री.दत्त महाविद्यालय जवळ देखील गतिरोधक बसविण्याची गरज असल्याचे पालक वर्गातून प्रखरपणे मागणी समोर येत आहे. यापूर्वीचा या दोन्ही रस्त्यांवरती इतिहास बघितला असता या ठिकाणी छोटे-मोठे अपघात यापूर्वी सुद्धा घडले आहे. तरी या सर्व लहान विद्यार्थी , कॉलेजला शिकणारे तरुण-तरुणी यांच्या जीवाशी निगडित असलेल्या या प्रश्नाकडे संबंधित कंपनीने त्वरित लक्ष द्यावे अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

# रामतीर्थ येथील शंकर नगरात इंग्रजी शिक्षणाचे नवे दालन

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.१६ जून -**

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमातील दर्जेदार शिक्षणाची संधी देणारी 'भास्करराव पाटील पब्लिक स्कूल' ही निवासी शाळा रामतीर्थ शंकर नगर येथे सुरू झाली असून, पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या माळरानावर उभारलेली ही शाळा छढ-उ (भटक्या जमाती), डढ (अनुसूचित जमाती) व शेतकरी कुटुंबातील ग्रामीण भागातील नवख्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहे. शाळेचे प्राचार्य श्री दुर्गा प्रसाद पांडेय यांनी



नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. हा प्रसंग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि आत्मीयता फुलवणारा ठरला आहे.

भास्करराव खतगावकर (माजी महसूलमंत्री व खासदार) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेली ही शाळा पहिली ते बारावीपर्यंत इंग्रजी माध्यमात असून, २०० विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश, निवासी सुविधा, भोजन, शालेय साहित्य व गणवेश दिला जात आहे.

शाळेच्या पहिल्याच दिवसापासून येथे शिस्त, गुणवत्ता आणि मायेचा स्पर्श यांचे उत्तम उदाहरण दिसून येते. प्राचार्य दूर्गाप्रसाद पांडेय यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता ही शाळेच्या यशस्वी वाटचालीची आधारशिला ठरत आहे.

याचबरोबर, माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. मीनल ताई निरंजन खतगावकर यांनी त्यांच्या कार्यकाळात आरोग्य सेवेसाठी या परिसरात आंबुलन्स सेवा उपलब्ध करून दिली असून, याचा लाभ आजही ग्रामस्थ घेत आहेत.

विशेषउल्लेखनीय बाबम्हणजे याशाळेतून आजपर्यत अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, वकील आणि प्रशासकीय सेवेत गेले आहेत. त्यांच्या यशामुळे ही शाळा केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचेही केंद्र बनली आहे. ग्रामीण भागातील अनेक गरीब व वंचित घटकातील मुलांसाठी ही शाळा एक नवी आशा ठरत आहे.

ई.स.२०२५-२६ या नविन शैक्षणिक वर्षातील पहिल्याच दिवशी

छढ-उ भटक्या जमाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांने येथील भास्कर राव पाटील खतगांवकर पब्लिक स्कूल या ईंग्रजी माध्यामाच्या निवासी शाळेत नव्याने मोफत वर्ग प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे

प्राचार्य दूर्गाप्रसाद पांडेय सरांनी या वेळी गुलाबी पुष्प देऊन स्वागत केले

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हयातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत

## सर्व शाळेत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, शाल व शैक्षणिक साहित्य देवून केला गौरव

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** पेज १ बॅनर
एम १, २, ३, ४

जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न जिल्ह्यातील शाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत परभणी, दि. १६ (जिमाका) : नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या प्रारंभानिमित्त जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद शाळांपासून ते नगर परिषद आणि काही खासगी शाळांपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करून नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. परभणी तालुक्यातील लोहगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे आयोजित कार्यक्रमात उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक गणेश पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप केले. यावेळी सरपंच विनोद लोहगावकर, पोलीस पाटील संजय कनसटवाड, ग्रामविकास अधिकारी डी.टी.दुधाटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंडितराव देशमुख, तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. पाटील यांनी आपल्या भाषणात जिल्हा परिषदेच्या शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भक्कम पाया घालतात, असे सांगून शाळेतील उपक्रमांची प्रशंसा केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक श्री. मद्रेवार यांच्यासह केंद्रप्रमुख अमृत देशमुख, शिक्षक श्री. बळी, श्री. खंदारे, श्री. वाघ आदींनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, उमरी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शाळा प्रवेश रथ व प्रवेश दिंडी काढण्यात आली. दिंडीत बालवर्गातील विद्यार्थ्यांनी रंगीत फुगे, फलक, पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभागी होत लोकांचे लक्ष वेधले. गावात फिरून लोकांना शाळा प्रवेशाचे महत्त्व पटवून देण्यात आले. जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही विविध सांस्कृतिक कार्यक्रम, फ ुलांनी सजवलेले स्वागतद्वार, फ ुगे, ढोल-ताशा, खेळणी यांचा वापर करून शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. पालक आणि ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.




## संक्षिप्त वृत्त...

### लाभार्थ्यांना जून ते ऑगस्ट कालावधीतील एकत्रित धान्य जून अखेर मिळणार

**परभणी,/प्रतिनिधी-** आगामी पावसाळा आणि परिणामी पूर इत्यादी प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे राष्ट्रीय अन्नरक्षा योजनेअंतर्गत प्राधान्य कुटुंब अन्न योजना व अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांना माहे जून ते ऑगस्ट-२०२५ पर्यंत एकत्रित धान्याची उचल करून लाभार्थ्यांना माहे जून, २०२५ अखेर तीन महिन्यांचे एकत्रित धान्य वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

निर्णयानुसार परभणी जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत प्राधान्य कुटुंब अन्न योजनेच्या शिधापत्रिकांची संख्या २,४४,५९१ व लाभार्थी संख्या १०,८६,०९६ आणि अंत्योदय शिधापत्रिकांची संख्या ४४,७९६ व लाभार्थी संख्या १,९६,९९७ एवढी आहे.

प्राधान्य कुटूंब अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रति सदस्य २ किलो गहू व ३ किलो तांदूळ व अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना प्रति शिधापत्रिका गहू १६ किलो व तांदूळ १९ किलो याप्रमाणे माहे ऑगस्टपर्यंतचे तीन महिन्याचे एकत्रित धान्य माहे जून, २०२५ अखेरपर्यंत रास्तभाव दुकानातून वितरीत होणार आहे.

पात्र लाभार्थीनी माहे जून ते ऑगस्ट या तीन महिन्याचे एकत्रित धान्याची उचल रास्तभाव दुकानात ई-पॉस मशीनवर आधार अधिप्रमाणीत करून घ्यावयाची आहे. लाभार्थ्यांनी ई-पॉस मशीनवर आधार अधिप्रमाणीत केल्यानंतर मशीनमधून संबंधित लाभार्थ्यांस तीन महिन्यांचे अनुज्ञेय असलेल्या धान्याचे पावतीप्रमाणे धान्य स्विकारण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे यांनी केले आहे.

### गंगाखेड येथे अल्पसंख्याक समाजातील शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतिगृह; प्रवेशासाठी आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** अल्पसंख्यांक समाजातील शिक्षण घेणाऱ्या मुलींकरीता गंगाखेड येथील शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह (कोद्रि रोड, आयटीआय कॉलेजच्या बाजुला, गंगाखेड) येथे प्रवेशासाठी आवाहन करण्यात आले आहे.

या वसतिगृहात १० वी, ११ वी, १२ वी, उच्च शिक्षण घेणाऱ्या एकूण ६० मुलींना शासन निर्णयानुसार (मुस्लिम-२१ मुली, बौद्ध-१३, पारशी -०१, शीख-०१ ख्रिश्चन-०३, जैन-०३, बिगर अल्पसंख्याक-१८) प्रवेश द्यावयाचा आहे. दि. १० जून २०२५ पासून ते दि. ३० जून २०२५ पर्यंत नोंदणी प्रक्रिया चालू राहील. इच्छुक विद्यार्थीनींनी प्रत्यक्ष येऊन नोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य, अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह, व्दारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गंगाखेड यांनी केले आहे.

### परभणी रेल्वेस्थानकावरील स्वच्छतागृहसुध्दा बंद

**परभणी,/प्रतिनिधी :** जंक्शन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परभणी रेल्वेस्थानकावर कामाचे निमित्त दाखवून रेल्वे प्रशासनाने महिनोन महिन्यापासून सार्वजनिक स्वच्छतागृहसुध्दा बंद केले असून त्यामुळे दररोज हजारो प्रवाशांची हेळसांड होत आहे.

येथील रेल्वेस्थानकावर महिनोन महिन्यापासून कामे सुरु आहेत. ही कामे अत्यंत कासवगतीने सुरु आहेत. ही कामे कधी पूर्ण होणार हे दक्षिण मध्य रेल्वे विभागाचे अधिकारी स्पष्ट करीत नाहीत. त्यासंबंधी ब्र बुध्दा काढीत नाहीत. त्यामुळे संबंधित एजन्सीधारकाने मनमानी पध्दतीने वेळ मिळेल तेव्हा कामे सुरु ठेवली आहेत. त्याचा परिणाम येथील रेल्वेस्थानकावर दररोज प्रवाशांना या कामांचा नाहक त्रास होतो आहे. विशेषतः रेल्वेस्थानकावर एकाच दरवाज्यातून प्रवाशांची ये-जा सुरु आहे. काहींनी ओरड केली तेव्हा दुसरा दरवाजा सुरु करण्यात आला. परंतु, रेल्वेस्थानकावरील लिफ्ट असो वा एक्स्लेटर ही दोन्ही यंत्रणा कायमस्वरुपी बंद आहे.

### परभणी पावसाच्या रिमझिम सरी

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरात सायंकाळी ५ च्या सुमारास रिमझिम अशा पावसाचे आगमन झाले. त्यामुळे नागरिकांना काहीसा का होईना पण दिलासा मिळाला आहे. सध्या परभणी शहरामध्ये दोन ते तीन असे जोरात पावसाचे आगमन झाले होते. शिवाय मोठया पावसाची सधया खरीप पिकांना गरज आहे. त्यातच या अशा पावसामुळे शेतकऱ्यांना खरीपाच्या पेरण्या करता येईनासे झाल्याआहेत. त्यातच वारंवार होणाऱ्या पावसाचा परिणाम पेरणीवर होत असतो त्यामुळे सध्या तरी शेतकऱ्यांना पेरणी करणे थांबवावे जेणेकरुन पिकांचे नुकसान होणार नाही. त्यातच शहरात सायंकाळी झालेल्या पावसामुळे अनेक नाल्यातील पाणी रस्त्यावर वाहू लागलेले दिसून आले होते.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३









परभणी- शहरात श्री.संत गजानन महाराज शेगावं यांची पालखी दरवर्षीप्रमाणेच परभणी शहरात आगमन झाले. यावेळी टाळ-मृदगांच्या गजरात वारकरी यांनी आपला अभुतपूर्व असा जल्लोष साजरा केला. यावेळी भाविक भक्तांनी शहरातील वसमत रोडवरील पाणी पिल्टरपासून श्रीं.च्या दर्शनासाठी एकच गर्दी केली होती. याप्रसंगी महिला, पुरुष, लहान मुले-मुली यासह वयोवृध्द नागरिकांनी पालखीचे दर्शन घेतले. छाया- रवि मानवतकर, परभणी

# प्रवेश उत्सवाने एकलव्य बाल विद्या मंदिर माध्यमिक, जिंतूर मध्ये आनंदाचे वातावरण

**जिंतूर,/प्रतिनिधी-** 'एकलव्य बाल विद्या मंदिर माध्यमिक, जिंतूर' येथे दिनांक १६ जून २०२५ रोजी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहात करण्यात आली. प्रवेश उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. शाळेत नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत फुलांच्या वर्षावात, करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात देवी सरस्वतीच्या पूजनाने झाली. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक एस. पी. गीते सर यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या आणि शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार व सर्जनशीलतेचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमाला श्री डी.जी.सानप, श्री बोराडे, श्री चव्हाण आणि श्री होले या मान्यवरांचा विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले व शिक्षकवृंदाच्या कार्याचे कौतुक केले.

प्रवेश उत्सव विद्यार्थ्यांच्या मनात शाळेबद्दल आत्मीयता, आत्मविश्वास आणि नवीन प्रेरणा निर्माण करणारा ठरला. हा दिवस त्यांच्या शैक्षणिक प्रवासात एक संस्मरणीय व आनंददायी क्षण ठरला.



# सेलू शहरातील प्रिन्स इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल के आर आर प्रिन्स इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांचे जोरदार पद्धतीने स्वागत करण्यात आले. उन्हाळी सुट्टी नंतर केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (सीबीएसई) च्या शाळा सोमवार ९ पासून नियमित सुरू होणार होत्या. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उन्हाळी सुट्टी संपवून शाळा नियमित केव्हा सुरू होते याची लगबग विद्यार्थ्यांमध्ये सुरू होती. आज शाळेचा पहिला दिवस असून देखील मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. शाळेची सुरुवात मुलांचे औक्षण करून करण्यात आली.



मुलांना गुलाबाचे फुल देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. गोड खाऊचे वाटप देखील करण्यात आले. श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी स्वतः उपस्थित राहून प्रत्येक विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांचा सन्मान केला.

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर पुन्हा एकदा शाळेच्या वातावरणात परतण्यासाठी विद्यार्थ्यांची जोरात तयारी सुरू झाली आहे शाळेमध्ये प्रवेश प्रक्रिया पुस्तकांचे वाटप, आणि नव्या शैक्षणिक धोरणाच्या प्रक्रियांचे काम चालू आहे. एकूणच शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये शाळा सुरू झाल्याचा आनंद व उत्साह दिसून आला. शाळेची प्रवेश प्रक्रिया अजूनही चालू आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले प्रवेश निश्चित करावे. या स्वागत समारंभाला प्राचार्य कार्तिक रत्नाला, प्रगती क्षीरसागर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सेलू पालिकेत स्वच्छता विभागात बोगस कर्मचारी !

## नागरिकांना वर्षाकाठी होतोय २४ लाखाचा भुर्दंड...

**शिवाजी आकात**

**सेलू ,/प्रतिनिधी-** :नगरपालिकेत स्वच्छता विभागात कंत्राटी कर्मचारी बोगस असल्याची माहिती पूढे येत असून अनेक वर्षापासून सदरिल कर्मचारी केवळ कागदोपत्री कार्यरत आहेत की काय?याची तपासणी सूरू असून आजपर्यंत पालिकेकडून या कर्मचा-यांना मानधन दिले असल्याने पलिकेने बोगस कर्मचारी पोसले असल्याचे समोर येत आहे.मागील अनेक वर्षापासून नगरपालिकेत स्वच्छतेसाठी ४६ कंत्राटी कर्मचारी नियूक्त केल्याचे दाखवले आहे.

दरम्यान नवनियूक्त प्रभारी मूख्याधिकारी तूकाराम कदम यांनी पालिकेचा पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी रविवार ८ रोजी सकाळी ५ वाजता स्वच्छता कर्मचारी यांची हजेरी घेतली असता प्रत्यक्षात केवळ १८ते १९ कर्मचारीच हजर झाले.मूख्याधिकारी यांनी दररोज सकाळी सदिरल स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचारी यांची हजेरी व नोटकँम फोटो घेत प्रत्यक्ष उपस्थीत व अनूपस्थित कर्मचारी यांच्या नोंदी घेण्यास सूरूवात केली मात्र अनेक गैरहजर कर्मचारी चार दिवस उलटूनही कामावर हजर झाले नसल्याने हे कर्मचारी केवळ महिन्याचे मानधन उचलण्याकरीता घेतले आहेत असा संभम्र होत असला तरी मूख्याधिकारी तूकाराम कदम यांनी या बोगस कर्मचा-यासह संबधित कंत्राटदाराने कंपनीवर कारवाही करण्याची तयारी केली असली तरी मागील अनेक वर्षापासून संबधित विभागात असे बोगस कर्मचारी कसासाठी पोसले जात आहेत हा प्रश्न निर्माण होत आहे सदरिल कर्मचा-यास प्रत्येकी कर्मचारी ९ हजार ते ७हजार रूपये मानधन देण्यात येते.स्वच्छता विभागात ४६ कंत्राटी कर्मचारी नियूक्त दाखविले आहेत.त्यापैकी प्रत्यक्षात २२ते २५ कर्मचारी गैरहजर असल्याने या अगोदर त्या गैरहजर कर्मचा-यांचे मानधन वाटप करण्यात येत असल्याने पालिकेकडून दरमाह




जवळपास २ लाख रूपये तर वर्षाकाठी २४ लाख रूपयाची बोगस बिलांची खैरात संबधित कंत्रांटी कर्मचारी व कंत्राटदार यांना करण्यात आली असल्याने शहरातील जनतेचा पैसा लूबाडण्याचे काम करण्यात आले आहे.पालिका प्रशासनाकडे शहरातील नागरीक विविध प्रकारचे करभरणा करत आहेत.मात्र पालिका प्रशासन नागरीकांच्या कर रूपातील निधी असा बोगस कर्मचारी दाखवून खर्च करत आसल्याने हा नाहक भूर्दंड शहरातील नागरीकांनाच भरावा लागत आहे.दरम्यान दररोज सकाळी ५ वाजता कर्मचारी उपस्थिती घेतली जात आसल्याने प्रमाणिक कर्तव्य बजावणारे केवळ १७ ते १८ कर्मचारी दररोज नियमितपणे स्वच्छतेचे काम करत आहेत.स्वच्छ भारत अभियानात सेलू पालिकेचा मराठवाड्यातून द्वितिय क्रमांक आला मात्र बोगस स्वच्छता कर्मचारी दाखवून स्वच्छ भारत अभियान स्पर्धेतील मिळालेला नावलौकीक कसा पचवला जाणार हा प्रश्न निर्माण झाला आहे. बोगस कर्मचारी रविवारी सकाळी ५ वाजता स्वच्छता विभागात काम करणारे कंत्राटी कर्मचारी यांची उपस्थिती घेतली असता कर्तव्यावर केवळ १८ ते १९ कर्मचारीच हजर होते.त्यानूसार दररोज सकाळी कर्मचा-यांची हजेरी व नोटकँममध्ये फोटो घेतला जात असून गैरहजर कर्मचारी उपस्थित दिसत नसल्याने हे कर्मचारी बोगस असल्याची शक्यता नाकारता येत नाही सदरिल दोषीवर कारवाही करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी मूख्याधिकारी तूकाराम कदम यांनी दिली.